# संपादकीय

## विज्ञानविषयक पुस्तकांचे महत्त्व

विज्ञानकथा हा एकविसाव्या शतकातला एक सर्वात जास्त लोकप्रिय, उत्कंठावर्धक आणि भविष्यवादी (फ्युचरिस्टिक) वाङ्मय प्रकार आहे. प्रतिभावंत लेखकांनी विज्ञानकथांमध्ये कल्पनेने रंगविलेल्या अनेक साधनांची व उपकरणांची प्रत्यक्षात निर्मिती करण्यात जगभरचे शास्त्रज्ञ गढलेले आहेत. ज्यूल व्हर्न या फ्रेंच विज्ञानकथाकाराने गेल्या शतकात चंद्रावर स्वारी, समुद्राच्या तळाशी, पृथ्वीच्या मध्यबिंदूचा प्रवास, जगाला ऐंशी दिवसात प्रदक्षिणा वगैरे कल्पना कादंबऱ्यांमधून मांडल्या, आणि त्या लहानपणी शाळेत असताना वाचून झपाटलेल्या बुद्धिमान मुलांनी, मोठे झाल्यावर प्रयोगशाळांमधून प्रत्यक्षात आणण्यासाठी यूरोप-अमेरिकेत आपल्या आयुष्याची बाजी लावली. भूस्थिर उपग्रहाद्वारे संवादवहनाची कल्पना आर्थर सी. क्लार्कने मांडली, आणि आज ती प्रत्यक्षात उतरलेली आपण पाहत आहो. १९२१ मध्ये कॅरेल चॅपेक या झेक नाटककाराने 'आरयुआर' या नाटकात यंत्रमानवाची-रोबोटची कल्पना मांडली; त्यानेच रोबोट हा शब्द तयार केला. (रोस्सम्स युनिव्हर्सल रोबॉट्स) आज लक्षावधी यंत्रमानव मानवाला किचकट व अवघड वाटणारी कामे देशोदेशींच्या कारखान्यांतून शिस्तशीरपणे करीत आहेत. मानवविरहित (रोबोटयुक्त) याने चंद्रावर जाऊन तेथील माहिती पाठवत आहेत. उडता गालिचा, जादूची छडी, जादूची आंगठी, हरकाम्या जेनी, वगैरे गोष्टी या केवळ परीकथातल्या भन्नाट कल्पनेच्या भराऱ्या उरलेल्या नाहीत. त्या प्रत्यक्षात वेगवेगळ्या प्रकारे आल्या आहेत; आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालल्या आहेत.

''विसाव्या शतकाने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या बळावर अवघ्या विश्वाला कवेत घेतले. मानवाला विस्तवाचा शोध लागला. दगडाची हत्यारे वापरण्यास त्याने आरंभ केला. त्या घटनेला सत्तर हजार वर्षे झाली. गेल्या ७० हजार वर्षात मानवाने जे काही आपल्या बुद्धिबळावर मिळवले, त्यापेक्षा जास्त त्याने एकट्या विसाव्या शतकात हस्तगत केले. स्थळकाळाच्या मर्यादा झुगारुन देण्याचे अनेकविध मार्ग त्याने शोधून काढले. साध्या सायकलपासून स्वनातीत विमानापर्यंत त्याने झेप घेतली. चंद्रावर पदार्पण केले. चंद्रावर पाऊल ठेवले. मंगळावर यान पाठवले. इतर ग्रहांच्या कक्षा भेदण्याचा प्रयत्न केला. अणूचा स्फोट करून प्रचंड ऊर्जा निर्माण होते, प्रचंड विध्वंस करता येतो हेही त्याने जाणले. टेलिग्राम, टेलिफोन, रेडिओ, दूरचित्रवाणी, टेलेक्स, फॅक्स, टेलिप्रिंटर, इंटरनेट, इ-मेल, उपग्रहाद्वारे संदेशवहन यामुळे घराघरातून संबंध जगाशी संपर्क साधण्याची क्षमता आपल्यात आली आहे. माणसाने हे सर्व मिळवले ते काही अपघाताने आणि चमत्काराने नव्हे. प्रत्येक टप्प्यावर त्याने आपल्या बुद्धीने, चिकाटीने, संशोधनाने, एकेका निसर्ग रहस्याचा भेद करीत, अडचणीतून मार्ग काढत, जे मिळाले त्याचा वापर करुन पुढचे पाऊल टाकले. नवनव्या गोष्टींचा छडा लावला. शंभर वर्षात अनेक शास्त्रज्ञ, संशोधक, बुद्धिमंत यांनी आपले सर्वस्व पणाला लावले. आज त्याचे भव्य स्वरूप दिसते. एकेका पावलाने केलेल्या वाटचालीने मानवाने किती प्रचंड पल्ला गाठला आहे; आणि किती उंच भरारी घेण्याची ताकद कमावली आहे याचे आश्चर्य वाटते.'' (**विज्ञान तंत्रज्ञानाची विस्मयकारक झेप** - प्रस्तावना) असे प्रतिपादन आज आपण बेधडकपणे करू शकतो.

संगणकांनी तर गेल्या दहा पंधरा वर्षात क्रांतीच घडवून आणली आहे. त्यांची माहिती देण्याची व संकलित करण्याची क्षमता विलक्षण आहे. त्यांच्या कामाचा झपाटा मती गुंग करणारा आहे. माहितीचे मोल आता आपल्याला कळू लागले आहे; आणि विशेष ज्ञानाच्या बळावर जग पादाक्रांत करता येते तसेच अल्पावधीत जगात सर्वात जास्त श्रीमंत होण्याचेही भाग्य लाभते हे मायक्रोसॉफ्टचे प्रमुख बिल गेट्स यांनी दाखवून दिले आहे. हार्वर्ड विद्यापीठातील आपले शिक्षण अर्धवट सोडून, आपल्याला संगणकाचे काम सुकर करण्याची सुचलेली कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याने काही मित्रांसह एक कंपनी काढली; आणि 'वुइंडोज' प्रोग्रॅमची अभिनव निर्मिती करुन अवघ्या दहा वर्षात अमेरिकेतील सर्वात जास्त श्रीमंत व्यक्ती होण्याएवढी मजल गाठली. जगातील प्रत्येक संगणकाला माझा प्रोग्रॅम वापरावा लागेल अशी त्याची प्रतिज्ञा. ती बहुतांशी पूर्ण झाली आहे.

विज्ञान हा केवळ शाळेत अभ्यासण्याचा, पाठ केलेली उत्तरे परीक्षेत लिहून पास होण्याचा विषय आहे हा आपला भ्रम आता आपण दूर केला पाहिजे. विज्ञान हा सतत वाढत जाणारा विषय आहे. आणि मूलभूत संकल्पना व्यवस्थित समजावून घेऊन, नवनव्या गोष्टींची रहस्ये जाणून घेण्याची आपल्या मुलामुलींची क्षमता विकसित व्हायला हवी, ही खूणगाठ आता शिक्षक-पालकांनी आणि अभ्यासक्रम ठरवणाऱ्या अधिकाऱ्यांनी मनाशी बांधून, तशी पावले टाकायला हवीत.

विज्ञानविषयक नवनवीन संशोधनाची माहिती देणारी पुस्तके मोठ्या प्रमाणावर मराठीत यावी यासाठी आम्ही सध्या प्रयत्नशील आहो. इंग्रजीतील विज्ञानविषयक पुस्तकांचे स्वैर अनुवाद मराठीत यावे म्हणूनही आमची धडपड चालू आहे. मराठी मुलांना लहानपणापासून विज्ञानाची गोडी लागायला हवी; त्यात अधिक खोल जाण्याची इच्छा जागी व्हायला हवी. तर मोठेपणी ही मुले निसर्गातील एकेका रहस्याचा भेद करुन, मानवी जीवनात नव्या सुखसोयींची लयलूट करु शकतील. सुधारित बियाण्यांमुळे धान्याचे उत्पादन वाढते; सुधारित संपर्कसाधनांनी जगभरशी संबंध तत्काळ प्रस्थापित होतो. आपण जे ज्ञान आता मिळवू तेही जगाचे होईल. त्या इर्षेने आपल्याकडील विज्ञान अभ्यासक्रमात परिवर्तन व्हायला हवे. त्यासाठी लागणाऱ्या पुस्तकांची निर्मिती व वितरण यासाठी खास प्रयत्न हवेत असे मुद्दाम सांगावेसे वाटते.

- संपादक

# विज्ञानकथेची विविध रूपे

***डॉ. बाळ फोंडके***

'इन्व्हेन्शन' आणि 'डिस्कव्हरी' या दोन इंग्रजी शब्दांना पर्यायी म्हणून मराठीत शोध हा एकच शब्द आहे. त्याचप्रमाणे 'इन्वेस्टिगेशन' आणि 'रिसर्च' या दोन वेगवगळ्या संदर्भातील इंग्रजी शब्दांना पर्यायी म्हणूनही 'शोधकार्य' हा एकच मराठी शब्द वापरला जातो. 'इन्वेस्टिगेशन' गुन्ह्याचे होते व गुन्हेगाराचा शोध लागतो. 'रिसर्च' वैज्ञानिक सूत्राचा शोध लागतो. तरीही एका अर्थी एकच मराठी शब्द वापरात असणं यथोचित वाटतं. कारण दोन्ही प्रक्रियांतील थरार सारखाच असतो. हा थरार एखाद्या रहस्यकथेतून अप्रत्यक्षपणे, सेकंडहॅन्ड अनुभवला तरी रोमांचकारक वाटतो. म्हणून तर भल्याभल्यांना रहस्यकथा वाचण्यात रस असतो. विज्ञानक्षेत्रातील असाच थरार अप्रत्यक्षरीत्या का होईना वाचकाला अनुभवयास का मिळू नये?

असा विचार मनात येण्यापूर्वी मी हा थरार प्रत्यक्षपणे अनुभवावयास सुरुवात केली होती. तरुण वय, नव्या क्षेत्रातील नवलाई, अणुसंशोधन केंद्रासारखी, भारतातीलच नव्हे तर जगातील एक अग्रगण्य संस्था, आणि होमी भाभांसारख्या स्फूर्तिदाता, विज्ञान संशोधनातील माझा, थरार अनुभवावयचा असेल तर यापेक्षा अधिक प्रभावशाली परिस्थिती मागूनही मिळणं कठीण.

संशोधनातून, स्वतःच्या किंवा इतरांच्या, जी निसर्गाची गुपितं उघड होत ती समजून तर काही वेळा खरोखरीच तोंडात बोट घालण्याची पाळी येई. कल्पितापेक्षाही सत्य म्हणतात त्याचा प्रत्यय येई आणि त्या प्रक्रियेत सहभाग होऊन, तो शोध लागण्यात आपलाही खारीचा वाटा आहे हे समजून, तर हा अनुभव, हा आनंद अधिकच उत्कट होई.

हा अनुभव मिळण्यापूर्वीपासूनच माझं लेखन सुरू झालं होतं. तेहतीस वर्षापूर्वी माझी पहिली कथा अनंत अंतरकरांनी 'मोहिनी'त प्रकाशित केली होती. त्याहीपेक्षा कथास्वीकृतीचं जे पत्र त्यांनी पाठविलं होतं त्यानं उत्साह दुणावला होता. स्वतःच्या लेखनकुवतीविषयी आत्मविश्वास बळावला होता. हे लेखन अर्थात संपूर्णतया ललित होतं. त्याचा विज्ञानाशी संबंध नव्हता. मिरासदारी थाटाच्या, किंबहुना त्यांच्या शैलीची नक्कल करून लिहिलेल्या त्या ग्रामीण कथा होत्या. सोलापुरात बालपण गेल्यामुळे ती भाषा परिचित होती. एरवी त्या कथा तशा विलक्षण अनुभवातून स्फुरलेल्या होत्या, असं म्हणता येणार नाही.



त्यामुळेही असावं, लेखन मंदगतीनंच चालू होतं. शिवाय शिक्षणही पूर्ण व्हायचं असल्यामुळे उपलब्ध वेळेवर त्याचाही अग्रहक्क होताच. ते पूर्ण होताहोताच अणुसंशोधन केंद्रात (भाभांचे नाव त्या केंद्राला मिळायला अजून पाच सहा वर्षे होती.) निवड झाल्यामुळे तर त्या प्रकारच्या लेखनाविषयी तशी आस्था वाटेना. लेखनाची उर्मी तशी स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे दोन चार इतर कथा लिहिल्या गेल्या, प्रकाशितही झाल्या. काही लिहिलेल्या अजूनही बासनात पडून असाव्यात.

लेखनाची उर्मी आणि व्यवसायाची ओढ यांच्यातील रस्सीखेच अशीच काही वर्षे चालू होती. ती संपवून दोन्हींची सांगड घालता येईल हे प्रथम लक्षात आले ते इंग्लंडमध्ये डॉक्टरेटचा अभ्यास करत असताना. त्यावेळचा एक सहकारी व अजूनही ऋणानुबंध ठेवून असलेला एक मित्र टॉनी फॉरेस्टर यानं एकदा आयझॅक ॲसिमॉव्हचा विज्ञानकथासंग्रह चाळावयास दिला. त्यानंतर ॲसिमॉव्हच्याच विज्ञानलेखसंग्रहाचंही वाचन झालं. त्यामुळे विज्ञानसाहित्य हा एक स्वतंत्र, आगळा आणि तितकाच आव्हान देणारा साहित्यप्रकार असल्याची ओळख पटली.

याच सुमारात एरिक ॲम्बलर, ग्रॅहॅम ग्रीन यांच्यासारख्या लेखकांच्या रहस्यकथाही मोठा प्रमाणात वाचत होतो. अभिजात साहित्याच्या चौकटीत राहूनही रहस्यकथेसारखा, उच्चभ्रू साहित्यिकांकडून हेटाळला गेलेला, साहित्यप्रकार कसा हाताळता येतो याचा या रहस्यकथा म्हणजे बोलका वस्तुपाठ आहे. त्यामुळे विज्ञानसाहित्यही, त्यातील थरारक, रोमहर्षक अनुभवांना साकार करत उभे करता येऊ शकते हा विश्वास वाटू लागला होता. व्यवसाय आणि मनोकामना यांची सांगड घालण्याचा मार्ग सापडला होता.

भारतात परतल्यानंतर त्या दिशेने प्रयत्नांना सुरूवात झाली. त्याच सुमारास गोविंदराव तळवलकर 'महाराष्ट्र टाइम्स'ला परिपूर्ण स्वरूप देण्याच्या उद्देशाने नवनवीन प्रयोग करत होते. त्यातच विज्ञानविषयक सदर चालू करण्याचा त्यांचा मानस होता. त्यातून माझे विज्ञानलेखन फुलत गेले. प्रथम विज्ञानलेख आणि त्यानंतर मूळप्रवृत्तीला अधिक पोषक अशा विज्ञानकथा या दोन्ही प्रकारचे लेखन तेव्हापासून गेली वीस बावीस वर्षे सुरु आहे.

त्या आधीही, माझ्यापूर्वी विज्ञानसाहित्य लिहिले गेले नव्हते अशातला भाग नाही. परंतु त्याची शैली ही भारदस्त, बोजड, प्रसंगी पाठ्यपुस्तकाच्या धाटणीने जाणारी होती. विज्ञानाच्या अभ्यासकांना त्या लेखनाकडे आकर्षित करता आले असते. पण इतर सामान्य वाचकाला त्या साहित्याकडे सहजासहजी वळविता येणं शक्य नाही, असा माझा समज झाला होता. सामान्य वाचकाला आकर्षित करावयाचं असेल तर लेखन सुबोध, त्याला समजेल अशा भाषेत लिहिलेलं आणि त्याला रुचेल अशा थाटात सादर केलेलं असावं, अशी माझी धारणा होती. सनावळीत गुंतून पडलेला इतिहास माणूस दूर सारतो. पण ऐतिहासिक कथाकादंबऱ्यात किंवा व्यक्तिचित्रातही तो गुंगून जातो, हे नुसतं पाहिलंच नव्हतं तर अनुभवलंही होतं.

त्यामुळे ललित साहित्याच्या अंगानं लेख लिहिण्याचा प्रथमपासूनच मी प्रयत्न केला आहे. साधी नेहमीच्या, शिळोप्याच्या गप्पांमधली भाषा, तांत्रिक परिभाषेला खड्यासारखं वेचून बाहेर टाकणं, दैनंदिन व्यवहारातली उदाहरणं, उपमा देऊन, गहन सूत्रांचं, कल्पनांचं स्पष्टीकरण देणं, असे स्वत:हून घालून घेतलेले दंडक मी कटाक्षानं पाळत आलो आहे. त्याचबरोबर विषयानुरुप भाषा व शैली यात फेरबदल करण्याचाही प्रयत्न मी करतो. ललित साहित्यातील काव्य सोडल्यास बाकी सर्व प्रकार या लेखांसाठी मी वापरले आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी विज्ञानलेखांपेक्षा, माझे मित्र अरविंद गोखले यांनी रूढ केलेला, 'कथालेख' हा शब्दप्रयोग मला अधिक समर्पक वाटतो. अर्थात शैली प्रथम ठरवून नंतर त्यात विषय दाबून दडपून बसविण्याचा अट्टाहास मी करत नाही. बहुतांश वेळा विषय मनात रूजला, त्यासंबंधीचे संदर्भ तपासून झाले की मनन होत असताना शैलीही आपोआप स्फुरून येते. अशी त्या विषयाची 'उबवणूक' झाली की लेख कागदावर उतरायला वेळ लागत नाही. त्यामुळे कित्येक वेळा विषय मनात घोळत असूनही सादरीकरणाचा घाट न सुचल्यामुळे लेखन तसेच अडून राहते.

माझ्या विज्ञानकथांमध्ये म्हणूनच ती कथा याचं भान मी सुटू देत नाही. त्या कथेचा आत्मा वैज्ञानिक सूत्राचा असला तरी ती कथा माणसाची आहे, विज्ञानातील नवनव्या उन्मेषांचा, त्याच्या आसपासच्या चराचर सृष्टीत, कितीही फरक पडला तरी त्याचे भावविश्व त्याच षड्रिपूंभोवती घोटाळत राहणार आहे, अशी माझी ठाम धारणा आहे. भावना प्रकट करण्याचा ढाचा कदाचित बदलेल पण मूळ भावना तीच राहणार आहे. या भूमिकेतूनच माझ्या बहुतेक कथा लिहिल्या गेल्या आहेत.

त्या लेखनातही अनेक प्रयोग आहेत. त्यामुळेच या कथांमध्ये प्रेमकथा आहेत, भावकथा आहेत, रहस्यकथा आहेत, विनोदी कथाही आहेत. परंतु सर्वप्रथम या भारतीय विज्ञानकथा आहेत. विज्ञान हे वैश्विक असलं तरी त्याच्या विभ्रमांवर होणारी माणसाची प्रतिक्रिया त्या त्या व्यक्तींच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीची नाळ सोडून होत नाही. जननपूर्व लिंगनिदानाच्या तंत्राचा स्त्रीगर्भांची वेचून हत्या करण्यासाठी जेव्हा उपयोग झाला तेव्हा त्याविरूद्ध उमटलेली येथील प्रतिक्रिया या भारतीय मातीतून वर आलेली होती. भारतीय संस्कृतीच्या आपल्या मनावरील प्रभावातून झालेली होती. त्याच घटनेवरची अमेरिकेतील किंवा युरोपातील प्रतिक्रिया संपूर्ण वेगळी झाली असती. म्हणूनच भारतीय विज्ञानकथा वेगळी आहे, तिला स्वतंत्र स्थान आहे, हे मी आजवर ठामपणे अनेक लेखांमधून, विशेषत: इंग्रजी लेखांमधून प्रतिपादत आलो आहे. नॅशनल बुक ट्रस्टतर्फे भारतीय विज्ञानकथांचा मी संपादित केलेला एक संग्रह प्रकाशित होत आहे. त्यातील कथांच्या निवडीसाठीही मी शक्यतो याच निकषाचा वापर केला आहे.

मी विज्ञानकथा का लिहितो, असा प्रश्न बऱ्याच वेळा विचारला जातो. वास्तविक हा प्रश्न का विचारला जावा हे मला समजत नाही. तुम्ही कथा का लिहिता, असा प्रश्न



कथाकारांना सहसा विचारला जात नाही, तरीही या प्रश्नांच उत्तर, मला वाटतं, मी दिलेलं आहे. एकतर माझं अनुभवविश्व विज्ञानानं समृद्ध आहे व तेवढ्यापुरतंच तसं मर्यादितही आहे. संवेदना भावूक व मध्यमवर्गीयांची जेवढी असते तेवढी आहे. मानसिक धाटणी कथालेखकाची आहे. या अजब मिश्रणातून विज्ञानकथाच आकार घेऊ शकतात.

तसा मी माझ्या लेखनाविषयी समाधानी आहे. समीक्षकांचे तसं, आणि हवं तितकं, लक्ष माझ्या लेखनाकडे गेलेलं नाही. परंतु ते केवळ माझ्यापुरतंच नाही. समस्त विज्ञानसाहित्याचीच उपेक्षा समीक्षकांनी केलेली आहे. त्याची खंत आहे कारण त्यामुळे या साहित्याची वाढ जेवढ्या जोमानं व्हावयास हवी तेवढ्या जोमानं होत नाही. मात्र वाचकांचा प्रतिसाद उदंड लाभला आहे. त्यामुळे ज्यांच्यासाठी हा प्रपंच करायचा त्यांनी पाठ फिरवलेली नाही, हे समाधान आहे.

समाधानी असलो तरी माझ्या लेखनाविषयी मी संतुष्ट मात्र नाही. ल्युइस टॉमस, पीटर मेडावार यांच्यासारखे उत्कृष्ट, दर्जेदार, विज्ञानविषयक ललितनिबंध लिहिता यावेत, ही आकांक्षा आहे. माझ्या इंग्रजी भाषेतील लेखनाला तो बाज देण्याचा माझा प्रयत्न आहे. त्याबाबतीत ती भाषा अधिक लवचिक, अधिक समृद्ध असल्याचे मला प्रत्यही जाणवते. संदर्भ शोधणेही त्या भाषेत अधिक, सोपे आहे. पण मराठीतही इंग्रजी शब्दांचा वापर जास्तीत जास्त टाळून त्या शैलीची रूजवात करण्याच्या प्रयत्नांत मी सध्या आहे.

---

*नवीन स्पर्धा*

## पुरस्कार आणि पुस्तके यांच्या जोड्या जुळवा

पुरस्कार मिळालेल्या काही पुस्तकांची नावे पुढे दिली आहेत. ती पुस्तके व पुरस्कार यांच्या जोड्या जुळवून, कार्डावर लिहून दिनांक २० मार्च १९९८ पर्यंत पाठवा. बरोबर उत्तरे पाठविणाऱ्या स्पर्धकांपैकी लॉट टाकून प्रथम येणाऱ्या पाच जणांना प्रत्येकी १०० रू.ची पुस्तके बक्षीस देण्यात येतील.

| | |
|---|---|
| १) ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी (म.वा. धोंड) | (अ) दमाणी पुरस्कार |
| २) अंधार यात्रा (गो.पु. देशपांडे) | (ब) महाराष्ट्र फाउंडेशन |
| ३) शिवशाहीचा शोध (वसंत कानेटकर) | (क) श्री. ज. जोशी पुरस्कार |
| ४) लॅरी बेकर (अतुल देऊळगावकर) | (ड) भारतीय भाषा परिषद, कलकत्ता |
| ५) कळप (राजन गवस) | (ई) साहित्य अकादमी, दिल्ली |

उत्तर पाठविण्याचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,**
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे ४११ ०३०.

# साहित्य वार्ता

**अभिनव बालसाहित्य जत्रा**

नॅशनल बुक ट्रस्टने सुमारे सात हजार बालवाचक क्लब चालवले आहेत. या रीडर्स क्लब योजनेद्वारे प्रत्येक शाळेला ५० रु. ची पुस्तके भेट म्हणून दिली जातात. शाळाही पुस्तकांची भर घालते. मुलांना शाळेत नियमितपणे पुस्तके वाचायला मिळतात. या वाचक क्लब योजनेमुळे नॅशनल बुक ट्रस्टची दरवर्षी बालवाङ्‌मयाची सुमारे दोन कोटी रुपयांची पुस्तके विकली जातात. दिल्ली येथे चिल्ड्रेन्स बुक अँड ॲक्टिव्हिटी फेअर नोव्हेंबर ९७ मध्ये घेण्यात आली. तिच्यात ४७ प्रकाशकांचा सहभाग होता. या ग्रंथजत्रेत पुस्तक-खजिन्याचा शोध हा उपक्रम राबविला गेला. भेट देणाऱ्या मुलांना आपल्याला नक्की कोणती पुस्तके हवीत याची कल्पना नसते. एका स्टॉलकडून दुसऱ्या स्टॉलकडे ती फिरत राहतात. अशा मुलांना विशिष्ट विषयाच्या पुस्तकांची माहिती व्हावी म्हणून सुरुवातीलाच विज्ञान, इतिहास, गोष्टी, भूगोल, खेळ, कविता वगैरे विषय लिहिलेल्या चिठ्ठ्यांतून एक उचलण्यास सांगितले गेले. त्याने ज्या विषयाची चिठ्ठी हाती येईल, त्याची निरनिराळ्या स्टॉलवर जाऊन त्या विषयाची पुस्तके शोधायची. किमान पन्नास पुस्तके शोधणाऱ्याला एक पुस्तक बक्षीस. या खजिना शोधामुळे मुलांना विशिष्ट विषयावरील पुस्तकांची चांगली कल्पना आली. प्रकाशकांनाही ही कल्पना पसंत पडली. मुलांनी त्यामुळे पुस्तकांची खरेदीही नेहमापेक्षा जास्त केली - असे या ग्रंथजत्रेच्या एक संयोजक पारो आनंद यांनी नंतर सांगितले. कथाकथन, काव्यवाचन, भेंड्या, वादस्पर्धा, वगैरे कार्यक्रमही या जत्रेत गर्दी खेचणारे ठरले.

**चित्रपट-दूरदर्शनवरील हिंसा व बाल गुन्हेगार**

डॉ. केव्हिन ब्राऊन यांनी बर्मिंगहम युनिव्हर्सिटीत केलेल्या संशोधनावरून चित्रपट-दूरचित्रवाणीवरील हिंसात्मक दृश्यांचा प्रभाव पडल्याने मुले गुन्हेगारीकडे अधिक सहजपणे वळतात या मताला पुष्टी मिळते. पडद्यावरील हिंसा आणि प्रत्यक्ष जीवनातील हिंसा यांचा संबंध दिसतो. ज्यांची प्रवृत्ती गुन्हागारीकडे आहे अशा मुलांना दूरचित्रवाणीतील हिंसात्मक प्रकारांमुळे प्रोत्साहन मिळते, आणि दहशतवादाने व हिंसाचाराने आपण लोकांवर वर्चस्व गाजवू शकतो अशी कल्पना त्यांच्या मनात दृढ होते. क्वेंटिन टारांटिनो याच्या 'पल्प फिक्शन' या हिंसाचारप्रधान गुन्हेगारी चित्रपटाच्या किशोर-प्रेक्षकांच्या पाहणीवरून ग्लासगो युनिव्हर्सिटीतील डॉ. ग्रेग फिलो यांनीही असाच निष्कर्ष आपल्या दि ब्राऊन रिपोर्टमध्ये काढला आहे. 'पल्प फिक्शन' चित्रपट पाहिलेल्या मुलांनी त्यातील खुन्यांचे वर्णन 'शांत व खळबळजनक - उत्कंठापूर्ण' (कूल अँड एक्सायटिंग) असे केले. आणि बळी गेलेल्या व्यक्तींचा उल्लेख मात्र 'आक्रस्ताळे' 'अ-शांत' असा केला. गुन्हेगारांच्या बुद्धीचे, कल्पकतेचे, गुंडगिरीचे, धाडसाचे



व झटपट श्रीमंतीचे मुलांना कौतुक वाटते. त्यांच्या तथाकथित पराक्रमाचे आकर्षण वाटते, असे यावरून लक्षात येते. खऱ्या पराक्रमाचे व चारित्र्याचे मोल त्यांना कळत नाही.

**अशोक जैन यांना 'भ्रमंती' मानचिन्ह**

मुंबई मराठी पत्रकार संघाचे या वर्षीचे पुरस्कार जाहीर झाले असून, 'महाराष्ट्र टाइम्स'चे कार्यकारी संपादक अशोक जैन यांना म.टा.च्या 'मैफल'मध्ये 'कानोकानी' या सदरात कलंदर नावाने उल्लेखनीय स्तंभलेखनाबद्दल यंदाचे 'भ्रमंती' मानचिन्ह व उल्लेखनीय पत्रकारितेबद्दल 'लोकसत्ता'चे निवासी संपादक प्रकाश बाळ यांना 'गो. भा. गुजर स्मृती पुरस्कार' घोषित करण्यात आला आहे.

**जैन साहित्याचा संपन्न वारसा नष्ट होण्यापासून वाचवा**

जैन साहित्य संस्कृतीच्या तीन हजार वर्षांच्या संपन्न वारशाच्या खुणा डागडुजीच्या नावाखाली नाश पावत आहेत, त्यामुळे हा वारसा जतन करण्यासाठी जैन समाजानेच पुढाकार घ्यायला हवा, अशी अपेक्षा जैन धर्मातील विविध कला व संस्कृतीच्या अभ्यासक व संशोधक डॉ. सरयू दोशी यांनी आज येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र जैन साहित्य परिषदेच्या वतीने 'जैन सहयोग'ने आयोजित केलेल्या ११व्या अखिल भारतीय मराठी जैन साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन टाइम्स वृत्तसमूहाचे कार्यकारी संचालक साहू रमेशचंद्र जैन यांच्या हस्ते झाले. त्या वेळी संमेलनाध्यक्ष पदावरून डॉ. सरयू दोशी बोलत होत्या. या साहित्य संमेलनाचा प्रारंभ सकाळी ग्रंथदिंडीने झाला. भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतीलाल मुथ्था यांच्या हस्ते प्रारंभ झाल्यानंतर हेलिकॉप्टरमधून ग्रंथदिंडीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटन सोहळ्यासाठी नियोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष द. मा. मिरासदार, जैन समाजातील धार्मिक गुरू लक्ष्मीसेन भट्टारकजी, ज्येष्ठ गांधीवादी नेते बाळासाहेब भारदे, मोहन धारिया, रावसाहेब पाटील, पारसदासजी जैन आदी उपस्थित होते.

साऱ्या भारतभर जैनांचे प्राचीन साहित्य, शिल्प व कला विखुरलेल्या अवस्थेत आहेत आणि त्या दुर्मिळ होत चालल्या आहेत. अनेक प्राचीन वास्तूंच्या जतन, डागडुजीसाठी श्रावक प्रयत्न करतात. पण, ते करण्याच्या पद्धती व तंत्र लक्षात घेता या प्राचीन वारशाचा नाशच होतोय की काय, असे वाटायला लागते. गेल्या पन्नास वर्षांत हा वारसा लोप पावत चालला असून, येत्या वीस-तीस वर्षांत नष्ट होण्याचीही भीती आहे, त्यामुळे जैन समाजाने यामध्ये पुढाकार घ्यायला हवा, असे मत डॉ. दोशी यांनी व्यक्त केले.

विविध जाती, धर्मांची स्वतंत्र साहित्य संमेलने झाली तरी अंतिमत: ती साहित्याचाच विचार करणार असली तर ती स्वागतार्ह गोष्टच आहे, असे मत श्री. मिरासदार यांनी या वेळी व्यक्त केले. मानवी मन हा अथांग सागरच आहे आणि मनाचा विचारच साहित्यात होत असतो.

किंबुहना मानवी मनाचा शोध हेच साहित्याने प्रयोजन व विचार असतो, असे मतही त्यांनी व्यक्त केले. धर्माच्या संकल्पनांचाच साहित्यिकांनी विचार करायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त करुन श्री. धारिया म्हणाले, ''सत्ता-पैसा-गुंडगिरीच्या दुष्टचक्रामुळे आपले स्वातंत्र्य व लोकशाहीच धोक्यात येते, तेव्हा त्याचे प्रतिबिंब साहित्यातही उमटायला हवे, याद्वारे नवा समाज व देश घडविण्यासाठी साहित्याने योगदान द्यायला हवे.''

थोर राष्ट्रभक्त, पत्रकार टिळक, रानडे, गोखले यांच्यापासून ज्ञानपीठप्राप्त कुसुमाग्रज, खांडेकरांचा वारसा मराठी भाषेला लाभला आहे. देशातील सर्वच भाषा विकासात जैन समाजाने योगदान दिले आहे आणि मराठी भाषेच्या विकासातही ते आहे, त्याचा वेध या संमेलनात घेतला जावा, अशी अपेक्षा उद्घाटनपर भाषणात श्री. जैन यांनी व्यक्त केली.

स्वागताध्यक्ष मिलिंद फडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर पंडित जयकुमार उपाध्ये यांनी आशीर्वचनपर भाषण केले. ॲड. प्रदीप शहा यांनी संमेलनाची आवश्यकता पटवणारी कविता सादर केली. उद्घाटन समारंभात स्मरणिका, साहित्यसूची व अन्य अनेक पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. शांतीलाल मुथ्था यांनी आभार मानले.

**'नाटक उभे करण्यात आंतरिक समाधान'**

''जीवनातले प्रश्न सोडविण्याच्या निमित्ताने आनंद निर्माण होत असतो, नाटक करताना मलाही आनंद आणि समाधान मिळते, म्हणूनच केवळ मी ते करीत आलो आहे,'' असे उद्गार ज्येष्ठ नाटक दिग्दर्शक पं. सत्यदेव दुबे यांनी काढले.

'संस्कृतम' या संस्थेतर्फे 'नाट्यम-९८' या राष्ट्रीय नाट्य-महोत्सवात श्री. दुबे व ज्येष्ठ मल्याळी नाट्यदिग्दर्शक कोवलम् नारायणम् पणीक्कर यांना 'संस्कृतम् सन्मान' देण्यात आला.

नाटकाची महान परंपरा, देशासाठीचे तिचे योगदान वगैरे गोष्टी खोट्या असतात, असे विधान करुन श्री. दुबे या वेळी बोलताना म्हणाले, 'पैसा, नाव, समाधान, आनंद यापैकी काहीही मिळविण्यासाठी रंगकर्मींनी नाटक करायला हवे. ते करण्यासाठी इतर कारणांपेक्षा तुमचे स्वतःचे कारण असायला हवे. मीही नाटकात समाधान आणि आनंद शोधत आलो आहे. देशाच्या भविष्याची मलाही चिंता आहे, पण त्याबद्दल कुतूहल बाळगणे एवढेच मी करू शकतो. श्री. पणीक्कर म्हणाले की, स्वसमाधनासाठी नाटक करणे हेच आपलेही ब्रीद आहे.

विचार हे ऊर्जेचेच स्वरूप आहे, असे सांगून डॉ. गोवारीकर म्हणाले की, विचारांच्या जोरावरच पृथ्वीपासून अंतराळपर्यंतच्या विविध समस्या सोडविण्याचा प्रयत्न होऊ शकला. त्या विचारांचाच आविष्कार नाटकातूनही होत असतो. 'बिर्ला-एटी अँड टी' या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राज मॅथ्यूज यांनी आपल्या भाषणात महोत्सवाला शुभेच्छा व्यक्त केल्या.



**'ब्रिटिश पुस्तकांची भारत ही मोठी बाजारपेठ'**

ब्रिटिश प्रकाशकांच्या दृष्टीने भारत ही ब्रिटिश पुस्तकांसाठीची जगातील मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळेच पुस्तक प्रदर्शनासारखा उपक्रम ब्रिटिश शासनासाठी केवळ सांस्कृतिक उपक्रम न राहता व्यावसायिक दृष्टीनेही त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते, असे ब्रिटिश सरकारचे भारतातील उपउच्चायुक्त मायकेल बेटस यांनी सांगितले.

ब्रिटिश कौन्सिलचा मुंबई विभाग आणि पुण्यातील ब्रिटिश लायब्ररी यांनी भरविलेल्या 'ब्रिटिश बुक फेअर'चे उद्घाटन झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सच्या वास्तूत हे पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले.

इंग्रजी पुस्तकांना भारतात गेल्या काही वर्षांपासून चांगली मागणी आहे. येथील लोक मातृभाषेबरोबरच इंग्रजीचा वापर द्वितीय भाषा म्हणून करत आहेत. इंग्रजी पुस्तकांची वाढती मागणी लक्षात घेऊन भारतात १९९२ पासून 'ब्रिटिश बुक फेअर'चा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे मायकेल बेट्स यांनी सांगितले. आतापर्यंत अशी चौदा प्रदर्शने भारतात भरवण्यात आली असून, २ लाख १० हजार पुस्तकप्रेमींनी या प्रदर्शनांना भेट दिली आहे. ३ कोटी ४५ लाख रुपयांची विक्री या प्रदर्शनातून झाली असल्याची माहितीही त्यांनी या वेळी दिली.

भारतातील इंग्रजी पुस्तके विकणाऱ्या पुस्तकांच्या दुकानातील पासष्ट टक्के जागा ही ब्रिटिश पुस्तकांनी व्यापलेली असते, या अनुभवाच्या आधारे अशा प्रकारची प्रदर्शने भरवून ब्रिटिश पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न प्रदर्शनाद्वारे केला जातो, असे त्यांनी सांगितले. पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष डॉ. आर. जे. राठी यांच्या हस्ते करण्यात आले. ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे असलेले शहर आता उत्तम शिक्षणासाठी भारतात प्रसिद्ध पावत आहे. ही शैक्षणिक परंपरा समृद्ध करण्याच्या कामात ब्रिटिश लायब्ररीचा मोठा वाटा असल्याचे डॉ. राठी यांनी सांगितले. अभ्यासूंसाठी आणि ग्रंथप्रेमींसाठी उत्तम सेवा देणारी लायब्ररी अशा शब्दांत त्यांनी पुण्यातील ब्रिटिश लायब्ररीचा गौरव केला. ब्रिटिश लायब्ररीच्या ग्रंथपाल श्रीमती अनिल बक्षी, ब्रिटिश कौन्सिलचे रॉबर्ट फ्रॉस्ट आणि इंटरनॅशनल बुक सर्व्हिसचे उपेंद्र दीक्षित व्यासपीठावर उपस्थित होते. प्रदर्शनात सर्व पुस्तकांची विक्री १० टक्के सवलतीच्या दराने झाली.

मॅकमिलन प्रेस, ओरिएंट लाँगमन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस यांसह बारा प्रमुख प्रकाशकांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, व्यवस्थापनशास्त्र, कला, पर्यटन, शब्दकोश, संरक्षण यांसह अनेकविध विषयांवरील सुमारे पंधरा हजार पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली.

**२६ पत्रकार हिंसाचारात मृत्युमुखी**

१९९७ या वर्षात आपली कामगिरी बजावत असताना १४ देशांचे २६ पत्रकार दहशतवादी हल्ल्यात ठार झाले, असे न्यूयॉर्कच्या पत्रकार संरक्षण समितीने एका अहवालात म्हटले आहे.

भारतात ७, कोलंबियात ४, मेक्सिकोत ३, कंबोडियात २ पत्रकार ठार झाले. गेल्या वर्षी इतर दहा राष्ट्रांत पत्रकार खुनी हल्ल्यात बळी पडले. अर्जेंटिना, ब्राझिल, ग्वाटेमाला, इंडोनेशिया, इराण, पाकिस्तान, फिलिपाईन्स, रवांडा, सिएरा लोन व युक्रेनही त्या देशांची नावे आहेत.

पत्रकारांच्या या हत्यांमागे वंशहत्या हे एक कारण आहे. त्याचबरोबर सेन्सॉरशिप हासुद्धा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. सरकारने या प्रकारचे गुन्हे शिक्षा न करता, तसेच चालू दिले तर घटनेने दिलेल्या वृत्तपत्र स्वातंत्र्याला काही अर्थच उरत नाही, या असे या संघटनेचे म्हणणे आहे. अर्जेंटिना, ग्वाटेमाला, युक्रेन, मेक्सिको येथील चार प्रकरणांमध्येच संबंधितांना पकडण्यात आले. इतर १४ देशांच्या सरकारांनी हत्या प्रकरणांची चौकशी सुरू करावी, असे रिपोर्टर्स सॅन्स फ्रंटियर्स ऑफ पॅरिस या संघटनेने म्हटले आहे.

प्रेस फ्रीडम ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून या संदर्भात चौकशी करण्यात येत असून, त्यानुसार २६ पत्रकार हल्ल्यात ठार झाले. १९९६ मध्ये २८ पत्रकार ठार झाले होते. १९९७ या वर्षी एकही अल्जिरियन पत्रकाराची हत्या झाली नाही. अगोदरच्या पाच वर्षात तेथे ६० पत्रकार मारले गेले होते.

भारतात ७ पत्रकार मरण पावले. त्यात राजकीय हिंसाचाराचाच मोठा भाग आहे. दहशतवाद्यांच्या कार बॉम्बस्फोटात हैदराबाद येथे दूरचित्रवाणीचे पाचजण १९ नोव्हेंबरला ठार झाले होते. काश्मीरमधील श्रीनगर येथे दूरचित्रवाणीचे दोन मुस्लिम पत्रकार गोळीबारात ठार झाले.

## वाचकांचा गट प्रबळ करणे गरजेचे

''लेखक आणि पुस्तके म्हणजे साहित्य नव्हे. त्यात वाचकांचे स्थान महत्त्वाचे आहे. किंबहुना वाचक हेच साहित्य तयार करतात. त्यामुळे वाचणाऱ्यांचा गट प्रबळ करणे गरजेचे आहे. लेखकांवर किंवा पुस्तकांवर बोलणे म्हणजे साहित्य नाही. वाचणाऱ्यांवर; तसेच त्यांच्याकडून चर्चेद्वारे अन्य लोकांवर होणारा परिणाम, याबाबतची चर्चा आणि त्यातून होणारे मंथन हे सारे साहित्यच आहे. ती एक प्रक्रिया आहे. पुस्तक एकदा भाषेत घुसले, की ते लेखकाचे राहत नाही. त्यामुळे साहित्याचा विचार करताना व्यक्तीचा करता येणार नाही. सौंदर्यशास्त्र, लय अशांमधून साहित्य अजिबात पुढे जात नाही. वाचकांमुळे ते पुढे जाते. आपल्याला साहित्याद्वारे काय हवे हे वाचक ठरवू शकतात. असे असूनही आजवर हा घटक दुर्लक्षित राहिला आहे. साहित्याला आणि लेखकाला मोठे व्हायचे असेल तर वाचकांचा गट प्रबळ करायला हवा. त्यासाठी एक मध्यवर्ती लाट निर्माण करायला हवी. हे झाले नाही तर सध्याचेच चित्र आणखी काही काळ राहणार. मग मरु घातलेल्या भाषांत मराठीही जाऊन बसेल.'' इंग्रजी भाषा मराठीला गिळंकृत करेल अशी स्थिती निर्माण झाली आहे. येथील शिक्षित समाज इंग्रजी भाषेकडे आकृष्ट झाला आहे. त्याचे व्यवहार या भाषेतून होत आहेत. अधिकाधिक 'स्मार्ट' बनण्यासाठी हे केले जात आहे. ज्या वेळी एखादी भाषा अस्तंगत होत असते, तेव्हा प्रथम द्विभाषिक गट तयार होतो. हा वाढायला लागतो. ज्या भाषेचे महत्त्व अधिक ती भाषा तो



अधिक वापरतो आणि हळूहळू त्याची मूळ भाषा तो विसरतो. मराठीचे असे होऊ नये, याची आपण दक्षता घेतली पाहिजे. असे प्रतिपादन प्रा. भालचंद्र नेमाडे यांनी पुणे येथे भारती विद्यापीठात केले. कुलगुरू डॉ. उत्तम भोईटे यांनी प्रास्ताविक केले. प्रकुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम यांनी स्वागत केले. कल्याणी दिवेकर यांनी आभार मानले.

## अली सरदार जाफरी यांना ज्ञानपीठ पुरस्कार

ज्येष्ठ उर्दू कवी व लेखक अली सरदार जाफरी यांची, १९९७ च्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. भारताय साहित्य समृद्ध करण्यासाठी त्यांनी केलेल्या असाधारण कामगिरीबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

ज्ञानपीठ पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ. करणसिंह होते. या पुरस्कारात अडीच लाख रुपये, मानचिन्ह आणि वाग्देवीची ब्राँझची प्रतिमा यांचा समावेश आहे. या पुरस्काराने आतापर्यंत सन्मानित झालेल्यांमध्ये फिराक गोरखपुरी व करातुलाइन हैदर यांचा समावेश आहे.

अली सरदार जाफरी यांचा जन्म ता. २९ नोव्हेंबर १९१३ रोजी उत्तर प्रदेशातील बलरामपूर येथे झाला. अनेक सामाजिक, साहित्यिक व राजकीय चळवळींमध्ये त्यांनी भाग घेतला. त्यांचे 'परवाझ', 'नई दुनिया को सलाम', 'खून की लकीर', 'आशिया जाग उठा', 'पत्थर की दीवार', 'एक ख्वाब और', 'पैराहँ-ए-शरार' आणि 'लहू पुकारता है' काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. अनेक भारतीय व परदेशी भाषांमध्ये त्यांच्या कवितांचे अनुवाद झाले आहेत. समाजातील अन्याय व दडपशाही यांच्याविरुद्ध झगडणाऱ्यांचे अली सरदार जाफरी हे प्रतिनिधी आहेत, असे भारतीय ज्ञानपीठाने म्हटले आहे.

## अमेरिकेतील पहिली बेस्ट सेलर लेखिका

सुसाना रॅविसन या लेखिकेची 'चार्लोट टेंपल'ही कादंबरी १७९१ साली अमेरिकेत प्रसिद्ध झाली. अमेरिकेतील पहिली बेस्ट सेलर कादंबरी म्हणून तिचा गौरव केला जातो. या कादंबरीच्या दहा वर्षात हजार ५० प्रती त्या काळी (दोनशे वर्षापूर्वी) खपल्या. नंतर तिच्या एकूण २०० आवृत्त्या निघाल्या. विसाव्या शतकातही ह्या कादंबरीचा खप सातत्याने चालूच राहिला. इंग्लंडमध्ये एका नौदल अधिकाऱ्याच्या कुटुंबात जन्म झाला. लग्नानंतर सुसानाचे अमेरिकेला स्थलांतर झाले. नवऱ्याचे हार्डवेअरचे दुकान नीट चालत नव्हते, तेव्हा सुसानाने बॉस्टनमध्ये एक मुलींची शाळा सुरू केली. त्याचवेळी तिने कादंबरी लिहिली. आज या कादंबरीच्या पहिल्या आवृत्त्यांच्या प्रती या चोखंदळ व्यक्तींच्या संग्रही आहेत; आणि त्यांची किंमत हजारो

लाखो डॉलर्सच्या घरात बोलली जाते.

जेम्स फेनिमोर कूपर याच्या 'दि लास्ट ऑफ दि मोहिकन्स' या कादंबरीचाही आरंभीच्या बेस्टसेलर्समध्ये उल्लेख होतो. तिच्या वीस लाख प्रती खपल्या होत्या.

**आचार्य अत्रे यांनी हास्याला प्रतिष्ठा मिळवून दिली - प्रा. कानेटकर**

डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रा. वसंतराव कानेटकर यांचे 'नाटककार अत्रे' या विषयावर कुलुगुरू डॉ. शिवराज नाकाडे यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. ''संवादशैलीचा प्रभावी वापर करुन आचार्य अत्रे यांनी प्रेक्षकांना मोहवून टाकले. विनोदी शैलीही त्यांना उपजतच लाभली होती. तिचाही त्यांनी खुबीने वापर केला. हास्याचा धबधबा निर्माण करून त्यांनी महाराष्ट्राला हसायला शिकविले. हास्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. हास्य व करुणा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत याचा त्यांच्या लेखनात प्रत्यय येतो.'' असे प्रा. कानेटकर यांनी म्हटले. विभागप्रमुख डॉ. लक्ष्मण देशपांडे यांनी प्रास्तविक केले.

**'होय होय वारकरी'चे प्रकाशन**

ग्रंथालीतर्फे डॉ. अरविंद नेरकर लिखित 'होय होय वारकरी' आणि 'अभंगाची वारी' या दोन पुस्तकांचे प्रकाशन मुंबई येथे आळंदीचे श्री. किसनमहाराज साखरे यांच्या हस्ते झाले. ज्ञानेश्वरी हिंदी, मराठी व इंग्रजी भाषातून इंटरनेटवर नेण्यात असून, त्यासाठी गेली अडीच वर्षे एक प्रकल्प राबविला जात आहे. ज्ञानेश्वरीची सीडी-रोम (कॉम्पॅक्ट डिस्क) गुढीपाडव्यापासून इंटरनेटवर उपलब्ध होईल असे त्यांनी सांगितले.

**शिवतीर्थ साहित्य पुरस्कार**

डॉ. अनिल अवचट यांना जुन्नरच्या आशियाना कला अकादमीतर्फे प्रथम शिवतीर्थ साहित्य पुरस्कार चित्रपट अभिनेते शरद तळवलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुणे जिल्ह्यातील लेखकांसाठी हा पुरस्कार आहे. अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध समीक्षक शंकर सारडा हे होते. ''प्रसिद्धी माध्यमाद्वारे दाखवले जाणारे जीवन व खरे जीवन यात खूप तफावत असते. संकुचित दृष्टीने बघण्याचे नाकारले तरच वास्तव जीवन नेमके बघायला मिळेल. वस्तुस्थितीचे साध्या भाषेत चित्रण केले तरी मराठी साहित्य समृद्ध होईल. जसे बोलतो तसे लिहिले तर चांगले साहित्य तयार होते व ते वाचकांच्या पसंतीलाही उतरते. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींनी आपापले अनुभव लिहिले तर साहित्यात मोठी भर पडू शकेल असे विचार डॉ. अवचट यांनी प्रकट केले. कला अकादमीतर्फे एकांकिका स्पर्धाही घेण्यात येतात. ॲड. कळमकर, गझलकार सौ. संगीता जोशी, बापू वाटवे हे या प्रसंगी उपस्थित होते.



बैंक ऑफ महाराष्ट्र
सेवा में प्रस्तुत कर रही है -
आपके सुख के लिए, आपकी समृद्धीके लिए

जमा
मिक्सी
यो ज ना
मिक्सी डिपॉजिट
जब भी आपको जरूरत पडे, अपनी सावधि जमा की ७५% तक रकम चेक द्वारा निकालने की अनोखी सुविधा वाली नयी योजना

जमा
योजना
सुलभ
सुलभ जमा योजना
न कोई नियम,
न कोई शर्त ....
आसान
आवर्ती जमा

शीतल
ज मा यो ज ना
शीतल जमा योजना
नवीकरण, रकम निकालने की सुविधा और ब्याज का लाभ भी पाइए .... साथ ही, अपना सावधि जमा भी जारी रखिए

बैंक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकार का उपक्रम)
प्रधान कार्यालय :
'लोकमंगल', १५०१, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५.

# अभिनंदन

**मोकळेपणाने चर्चाच नसेल तर भाषण - लेखन स्वांतत्र्य व्यर्थ - य. दि. फडके**

कृतज्ञतेचा, समाधानाच्या हुंकारांचा मात्र तरीही सामाजिक ऋणातून पूर्णांशाने उतराई न झाल्याची असोशी व्यक्त करणारा सोहळा होता तो. कर्तव्यनिष्ठेचा पेला काठोकाठ भरत आलेला असूनही तळाशी कुठेतरी खंत डिवचत असावी, अस्वस्थ करीत असावी, अशा काहीशा संमिश्र मनस्थितीची जाणीव ज्येष्ठ संशोधक, महाराष्ट्र इतिहासकार डॉ. य. दि. फडके हे त्यांच्या ६७ व्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला करून देत होते. ज्या समाजात वर्ज्य समजल्या जाणाऱ्या विषयांवर मोकळेपणाने चर्चा होणार नसेल त्या समाजात भाषण-लेखन स्वातंत्र्य व्यर्थ आहे, असा विचार ते देत होते. मात्र या विचाराने अस्वस्थ होऊन ही स्थिती बदलण्याचा ध्यास घेऊ शकणारा तरुण पिढीचा प्रतिनिधी उपस्थितांत दुर्मिळच होता.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने आपल्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने नायगाव येथील वास्तूत आयोजिलेला हा समारंभ म्हणजे कर्तव्यनिष्ठेपायी कोणत्याही तडजोडी न करता आयुष्य सार्थकी लावलेल्या व्यक्तिमत्त्वांचे विचारधन सहजी मिळण्याची एक सुवर्णसंधीच होती. 'कृतार्थ जीवन' ही श्रेणी ज्यांनी अक्षरशः कमावली ते य. दि. विचारधनाचा खजिना नेहमीप्रमाणेच मोकळा करते झालेच, पण त्याचबरोबर साक्षेपी संपादक श्री. पु. भागवत, प्रा. राम जोशी, य. दिं.चे बालमित्र निवृत्त पोलीस महासंचालक द. शं. सोमण या साऱ्यांनी य. दिं.च्या अभीष्टचिंतनाच्या या सोहळ्याला अपेक्षित अशी वैचारिकतेची डूब देत, विविध वैयक्तिक आठवणींचा फुलोरा फुलवत सायंकाळ संस्मरणीय केली. याच सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये यांनी शब्दबद्ध केलेल्या य. दिं.च्या जीवनप्रवासावर आधारित मुलाखतीच्या 'संशोधक य. दि. फडके' या पुस्तिकेचे प्रकाशन झाले आणि उपस्थितांत जरी तरुण पिढीचा अभाव असला तरी व्यासपीठावरील निमंत्रितांतील तरुण संशोधक डॉ. राजेंद्र व्होरा, मनोहर कदम यांना य. दिं.चे आयुष्य हे नव्या संशोधकांना आदर्शवत प्रेरक आहे असे उद्‌गार काढल्यावाचून राहवलं नाही. 'किस्त्रीम'चे संपादक ह. मो. मराठे यांनीही उपस्थितांशी संवाद साधला. अत्यंत ओघवती भाषा आणि सहज संवादरूपी शैली कमावलेल्या य. दिं.चे मनोगत म्हणजे आत्मचिंतन होतं. ज्या समाजात जन्मलो त्या समाजाचा सर्वांगीण शोध घेण्याचा माझा ध्यास म्हणजे आपणच आपल्याला ओळखण्याचा प्रयत्न करण्याचा प्रकार आहे. हा संशोधनाचा आनंद मी भरपूर लुटला. मात्र अलीकडे हा ध्यास लष्कराच्या भाकऱ्या वाटू लागण्यासारख्या घटना घडत आहेत. सध्या नव्वदीच्या घरात असलेल्या डॉ. वि. भि. कोलते यांनी संपादित केलेल्या 'लीळाचरित्र' या ग्रंथाच्या साऱ्या प्रती जप्त करण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे आणि पंचवीस हजार रुपये दंडही ठोठावला आहे. ही बातमी क्लेशकारक असल्याचे सांगून य. दि. म्हणाले की, काहीही न वाचणाऱ्या राजकीय नेत्यांना निवडणूक जवळ आली की, असा लोकप्रक्षोभाचा ठरू शकणारा विषय हवाच असतो. खरं तर ग्रंथ राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केलेला असल्याने राज्य शासनानेच या निर्णयाविरुद्ध वरच्या न्यायालयात दाद मागायला हवी. मात्र अद्यापि तशी हालचाल दिसत नाही.

न. र. फाटकांनी केलेले मार्गदर्शन, बाळ ठाकरे यांची घेतलेली मुलाखत, 'सामना' वृत्तपत्रात केलेल लेखन आणि या लेखनातील एकही शब्द न कापण्याचा संपादकांचा खुलेपणा, ठाकरे यांच्याशी केलेले वैचारिक द्वंद्व, 'मौज' च्या १९४७च्या अंकात 'काँग्रेसचे विसर्जन करावे काय?' या विषयावरील लेखाला मिळालेले पारितोषिक, आपले परममित्र, या साऱ्या आठवणींचा एक अनोखा स्पर्श य. दिं.च्या मनोगताला लाभला होता. माझ्या बालमित्राबरोबर, सोमणांसह जागतिक दहशतवादावरचे पुस्तक लिहिण्याचा संकल्प सोडला आहे. या विषयावर मराठी भाषेत शास्त्रीय, काटेकोरपणे, चिकित्सकपणे लिहिलेले पुस्तक नाही. ही उणीव भरून काढता आली तर आनंदच होईल, असे सांगून य. दि. थांबले. अध्यक्षपदावरून बोलताना श्री. भागवतांनी समाजाला, विचारवंतांना, प्राध्यापकांना त्यांच्यावरील जबाबदारीचं भान लक्षात आणून दिलं. ज्ञानवंतांच्या मतांची, त्यांच्या विवेचनाची परीक्षा झाली पाहिजे. उणिवा, मतभेद व्यक्त झाले पाहिजेत, तरच त्या विचारवंताला आपलं काम पोहोचल्याचं समाधान मिळतं. ही उणीव ही य. दिं.ना जाणवत असणार असे स्पष्ट करून त्यांच्या संशोधनाचे चांगले परीक्षण क्वचितच झालेले आपण पाहिले आहे अशी खंत श्री. पुं.नी व्यक्त केली.

# पुस्तक परिचय

**या विश्वात कितीतरी अशा गूढ गोष्टी आहेत की जेथे मती गुंग होते**

# *अज्ञाताचे विज्ञान*

**डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी**

आपल्या जीवनात अनेक असे प्रसंग घडतात की आपली बुद्धी चक्रावून जाते, असे अनेक अनुभव लोक सांगतात की त्यांचे तर्कशक्तीच्या बळावर आकलन - स्पष्टीकरण करणे जड जाते. ज्या गोष्टींचे स्पष्टीकरण व कार्यकारणभाव सहजपणे उलगडत नाही, अशा गोष्टी संदिग्ध आणि गूढ ठरतात, त्यांची गूढरचना ही माणसाला पिढ्यान्‌पिढ्या भूल घालत राहिली आहे. आपल्या भविष्यात काय दडलेले आहे, आपल्या पूर्वजन्मी आपण कोण होतो, पक्ष्यांची भाषा आपल्याला कळू शकते का, मृत्यूनंतर माणसाचे काय होते, आत्मा हा दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करून काही कामे करून घेऊ शकतो का, भूत वगैरे प्रकार खरोखरच आहेत का, दूर अंतरावर असणाऱ्या दोन व्यक्तींच्या मनात एकाच वेळी एकच विचार होणे असा प्रकार संभवतो का, भावी अनर्थाची पूर्वसूचना मिळते का, काही विशिष्ट स्थळी गेल्यावर व विशिष्ट व्यक्तींच्या सहवासात गेल्यावर मनःशांतीचा अनुभव येतो हे खरे आहे का, चंद्र व ग्रह यांचा मानवी मनावर व जीवनावर प्रभाव पडतो का, ग्रहशांती-यज्ञयाग करून काही फायदा होतो का, केवळ स्पर्शाने रोग बरा करण्याची क्षमता कोणात असते का, पंचेंद्रियांनी होऊ शकत नाही असे काही ज्ञान आहे का, आणि तसे ते असल्यास त्याच्या आकलनासाठी अधिक ज्ञानेंद्रिये असणे संभाव्य आहे का, लहान वयातच संगीत, गणित वगैरे क्षेत्रांत विशेष प्रावीण्य दाखविणाऱ्या मुलामुलींच्या व पूर्वजन्माच्या स्मृती सांगणाऱ्या व्यक्तींच्या अनुभवाचा अन्वयार्थ कसा लावायचा इ. इ... हे आणि असे अनेक प्रश्न हे जगभरच्या शास्त्रज्ञांनाही सारखे सतावत राहिलेले आहेत. गूढ व रहस्यपूर्ण असा त्यांच्यावर शिक्का मारून ते स्वस्थ बसलेले नाहीत. त्यांचा उलगडा करण्यासाठी ते प्रयोग करीत आहेत.



अज्ञानाचा बोध व्हावा, त्याची उकल व्हावी म्हणून त्यांची खटपट चालू आहे.

अशा या प्रयत्नांची माहिती देण्याचा प्रयत्न डॉ. सुरेशचंद्र कुलकर्णी यांनी 'अज्ञानाचे विज्ञान' या पुस्तकातील चोवीस लेखांद्वारे केला आहे. मानवी सृष्टीतल्या अज्ञात, गूढ अशा अनेक बाबींवर प्रकाश टाकणारे हे लेख आहेत. त्यासाठी त्यांनी अनेक पाश्चात्त्य पुस्तकांचा उपयोग केला आहे. अडीच वर्षे खपून बारा-तेरा हजार पृष्ठांचे वाचन करून, टिपणे काढून, भरपूर श्रम घेऊन योग्य ते संदर्भ जमवून या लेखांची मांडणी केली आहे. पाश्चात्त्य देशात एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी काही व्यक्ती व संस्था सतत प्रयत्नशील असतात आणि आपल्या संशोधनाचे निष्कर्ष वेळोवेळी प्रसिद्ध करीत असतात. काही संशोधक हे निष्कर्ष काढताना नको तेवढी चलाखी दाखवून, दिशाभूलही करतात. परंतु एकूण या संशोधनामुळे अनेक बाबींवर वेगवेगळ्या अंगांनी प्रकाश पडत जातो हे खरेच आहे.

डॉ. नाडकर्णी यांनी पुढील विषय या पुस्तकात घेतले आहेत. वैश्विक चक्र व त्याचे परिणाम, चंद्राचा मानवी जीवनावर व स्वभावावर होणारा परिणाम, ग्रह आणि व्यवसाय, ग्रहावरून भविष्य सांगण्याचा प्रयत्न, आत्मा, उपद्व्यापी कंपनलहरी, मानसिक सामर्थ्य, प्रत्येक व्यक्तीभोवती असणारे तेजोवलय कोष, विद्युत चुंबकीय क्षेत्र, ॲक्युपंक्चर व शियात्सू इ. उपचार पद्धती, मनलहरी, इच्छाशक्ती, धातूचे सोन्यात रूपांतर करणारा परीस, आदिम समाजातील औषधोपचार पद्धती, हस्तरेखाशास्त्र, संमोहनशास्त्र, बाह्यमन व अंतर्मन, मंत्रविद्या व चेटूक, स्वप्ने व अबोध मन, दूर संवेदना, अंतःप्रेरणेने मिळणारे संकेत, काळावर मात करण्याचे प्रयत्न, भूतयोनीचे गौडबंगाल, मृत्यूनंतरचे अस्तित्व, मानवाचे भवितव्य.

ह्या लेखांतून अनेक शास्त्रज्ञ, अनेक प्रयोग, अनेक नव्या संकल्पना समोर येतात. आपल्या विचारांना त्यामुळे चालना मिळते.

- ❖ पस्तीस आणि चाळीस सेल्सियस तापमानाच्या दरम्यान पाणी अत्यंत अस्थिर वागते. माणसाच्या शरीराचे तापमान नेमके याच तापमानाच्या टप्प्यात असते. हा केवळ योगायोग मानायचा का? (७)
- ❖ पृथ्वीवर सापडणाऱ्या सुमारे ११० मूलद्रव्यांपैकी फक्त सोळा द्रव्येच सजीवांचे शरीर घडवितात. त्यांच्या क्रमवारीचे संयुग साखळ्या (कंपाउंड चेन्स) बनविल्या जातात. बुरशीपासून देवमाशापर्यंत सर्वांच्या बाबतीत हाच प्रकार होतो. (९) विशिष्ट क्रमवार मांडणीने होणारी सजीवांची निर्मिती हा एक चमत्कारच आहे.
- ❖ मांजराचे कान इतके तीक्ष्ण असतात की त्यांचे वर्णन हाय फिडेलिटी इक्विपमेंट असे करता येईल. (११)
- ❖ डॉ. सेमिअन किर्लेअन यांनी मानवी शरीराभोवती असणाऱ्या तेजोवलय कोषाचा फोटो घेणारे तंत्र विकसित केले. (८९)
- ❖ हाताच्या पृष्ठभागावरचे किरणांचे पुंज या यंत्राद्वारे दिसल्यावर डॉ. मिखाईल गायकिन

यांना ॲक्युपंक्चरच्या उपचारबिंदूच्या नकाशाशी ते जुळतात असे आढळून आले. (९०)

❖ चरक व सुश्रुत यांनी मानवी शरीरावरील १०७ मर्मबिंदूंची नोंद केलेली आहे. (९१) टोबिस्कोप या यंत्रामुळे बायोप्लाझ्मा (सूक्ष्मदेह), तेजोवलय (ऑरा) आणि ॲक्युपंक्चर व शियात्सू या उपचार पद्धतीत एक नवीनच दुवा निर्माण झाला आहे. (९२) सूक्ष्मदेह व तेजोवलय दोहोंना जोडणारे मन शरीरात कुठे आहे?

❖ अंतर्मनात अनेक सुप्त भावना दाबून ठेवल्या जातात. कारणपरत्वे त्यांचा एकाएकी उद्रेक होतो, तेव्हा मनोगतिकीच्या घटना घडून येतात. त्यांना भानामती असे मानले जात असावे असे डॉ. नांदोर फॉडोर हे मनोविश्लेषणतज्ज्ञ मानतात. (९५)

❖ डॉ. जेनेडी सर्जेयेव्ह यांनी म्हटले आहे की अत्यंत गाढ झोपेत वा समाधी अवस्थेत मेंदूतून प्रतिसेकंद चार लयीत हृदयाचे ठोके स्पंदन पावत असतात. त्यांना थिटा लहरी म्हणतात. (९६)

❖ जपानमध्ये १९१०-१९१३ या अवधीत टोमाकिशी फुकुराई याने सीलबंद फोटोप्लेटवर आपल्या मनातील विचारांचे छायाचित्र उमटवून दाखविण्याचा प्रयोग केला. (९८) निरनिराळ्या भाषांतील शब्दोच्चारणाची पद्धत व त्यातून निर्माण होणारे ध्वनी लक्षात घेऊन जागतिक ध्वन्यानुसारी (फोनेटिक) वर्णमाला तयार करण्यात आली. (५६)

❖ विश्वातील सर्व अणू हे कंपनशील आहेत आणि एखाद्या गोलाकार घंटेप्रमाणे सतत नादनिर्मिती करीत असतात. परमाणू हे स्वरसमूह आहेत. सजीवांचे शरीर हे एक वाद्य आहे. त्यातून सतत संगीत बाहेर पडत असते. 'सिंफोनी ऑफ लाइफ' या ग्रंथात डॉ. डोनाल्ड अँड्र्यू यांनी ही कल्पना मांडली आहे. (५७)

❖ दूर अंतरावरून, स्पर्श न करता दिवा पेटवता येतो हा प्रयोग १९३०-३१ साली डॉ. हॅरी प्राइस यांनी मार्गरिट एलिन या महिलेबाबत करून दाखवला. (६७)

❖ नेलिया मिखाइलोव्हा या महिलेने स्लाइसच्या चळतीकडे रोखून पाहिले. त्यातील एक स्लाइस बाहेर पडून नेलियाच्या दिशेने सरकत गेली - ही रशियातील साहित्यिक लेव्ह कोलोनी आणि व्हादिन मरीन यांनी नोंदवलेली कहाणी. (७५) नेलियाचे विद्युत चुंबकीय क्षेत्र इतरापेक्षा अधिक शक्तिशाली होते. केवळ नजरेने अंड्याचा पांढरा व पिवळा भाग अलग केला. (७७)

❖ लहान मेंदूच्या खालील भागात कल्पिलेले आज्ञाचक्र (थॅलॅमाय) हे अत्यंत महत्त्वाचे ज्ञानकेंद्र असन कुंडलिनी जागृती करणारे साधक त्याला शिवाचे स्थान मानतात. (७७)

❖ प्रत्येक सजीवाच्या शरीराभोवती त्याचे स्वतःचे असे एक स्थितिज विद्युत क्षेत्र (स्टॅटिक इलेक्ट्रिकल फील्ड) असते.



❖ गूढ विद्यासाधक हे तेजोवलय कोष पाहू शकतात वा तसा दावा करतात. (८३) डॉ. ऑस्कर बॅग्नल आणि डॉ. वॉल्टर क्लिनर यांनी त्यावर प्रयोग केले. (८४)

❖ शरीरातील सर्वात महत्त्वाची चेतासंस्था दिवसाकाठी तीन ग्रॅम पोटॅशियम उपयोगात आणते. आर्क्टिक व अंटार्क्टिक प्रदेशात दोन वर्षांपेक्षा जास्त काळ राहिलेल्या शास्त्रज्ञांच्या बाबतीतही हेच प्रमाण आढळते. यावरून पृथ्वीचे दिनमानचक्र आणि मानवी शरीराच्या क्रिया यांचा संबंध लक्षात येतो. (१३)

❖ पहाटे चार वाजता मातेचे शरीर कमाल शिथिल अवस्थेत असते. त्याच वेळेस जन्मणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त आढळते. पहाटे शरीर क्रिया मंदावलेल्या असल्याने गुन्हेगारांना पकडण्यासाठी पोलिस ही वेळ निवडतात.

❖ सर्वाधिक मतिमंद मुले डिसेंबर-जानेवारी या कालावधीत जन्मलेली दिसतात. मे-जून मध्ये जन्मलेल्या मुलांचा बुद्ध्यांक सर्वात जास्त आढळतो. डॉ. हॅटिंग्टन व डॉ. हेन्री नॉब्लॉक यांचे संशोधन. (१४)

❖ शुक्ल पक्षात चंद्रकला वाढताना व पौर्णिमेला केलेल्या शस्त्रक्रियांच्या वेळी हजारपैकी ८७० रुग्णांना रक्तस्राव जास्त होतो. (१९) अमावास्येच्या आसपास केलेल्या शस्त्रक्रियांत अतिरिक्त रक्तस्राव कमी होतो म्हणून ते दिवस शस्त्रक्रियांसाठी वापरावे असे डॉ. एडसन अँड्र्यू यांचे मत आहे. (२०)

❖ चोरी, उचलेगिरी, आततायी बेदरकार ड्रायव्हिंग, अतिरिक्त नशापान, इ. गुन्हे पौर्णिमेच्या दिवशी अधिक घडतात, असे अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ क्लायमेटॉलॉजीच्या अहवालात दिले आहे. (२०)

❖ जन्मलग्नी शनि-मंगळाशी निगडित असलेल्या व्यक्ती वैद्यकीय व्यवसायात जास्त आढळतात असा डॉ. मायकेल गॉकिलिन यांनी निष्कर्ष नोंदवला आहे. (२६) कर्करोग होण्यापूर्वी शरीराच्या अवयवांच्या विद्युतभारात लक्षणीय बदल घडून येतात असे डॉ. हॅरॉल्ड बर (येल युनिव्हर्सिटी) यांनी जाहीर केले. (३९) संपूर्ण शरीरात एकदिश विद्युत प्रवाह आहे. मात्र चेतासंस्थेतून निघणाऱ्या विद्युत चुंबकीय लहरी वेगळ्या आहेत.

❖ सजीवाचे विद्युतचुंबकीय क्षेत्र हे एकात्मीभूत कार्यतंत्र आहे आणि सजीवाचा मृत्यू झाल्यानंतर देखील ते काही काळ मागे उरते असे डॉ. एडवर्ड रसेल यांना आढळून आले. (४१) 'नियतीची संकल्पना' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. हे क्षेत्र म्हणजे तर आत्मा नव्हे ना?

❖ पिरॅमिडच्या विशिष्ट रचनेमुळे खाद्यपदार्थ काही काळ तसेच टिकून राहतात. पिरॅमिडच्या आत ठेवलेली विद्युत उपकरणे कोणताही बिघाड न होता बंद पडतात असे डॉ. अमर गोहेड यांना आढळून आले. (५१)

❖ गोल, चौकोनी व दंडगोलाकृती डब्यापेक्षा मधे फुगीर असणाऱ्या पिंपात दारू वा बीअर स्वादिष्ट बनते. (५१)

❖ बुरशीसारखे सूक्ष्म जीवजंतू व मानवासारखा विकसित गुंतागुंतीचा देह यांच्या ॲमिनो ॲसिडस एकाच पद्धतीने निर्माण होतात. निसर्गात आढळणाऱ्या विविध आकृतिबंधांच्या शास्त्राला 'सायमॅटिक्स' हे नाव आहे. (५४)

❖ कंपनलहरी व त्यांच्या प्रभावामुळे घडवली जाणारी आकृती यांतील कार्यकारणभाव लक्षात घेऊन डॉ. हान्स येनी चांनी टोनोस्कोप हे यंत्र बनवले. ध्वनिलहरींची त्रिमिती आकृती रेखाटणारे हे साधन आहे. (५५)

**पृष्ठे २०८. एकशे तीस रुपये**



**माणसाचा मदतनीस की मारक हा प्रश्न निर्माण करणारा यंत्रमानव**

# यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

**निरंजन घाटे**

माणूस जी जी कामे करतो ती ती कामे पुढच्या काळात रोबो म्हणजे यंत्रमानव करू लागेल. रोबोंच्या प्रसारामुळे आपल्या जीवनप्रणालीत क्रांतिकारक बदल घडून येतील.

यंत्रमानव व कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात सध्या जगभर मोठ्या प्रमाणावर संशोधन चालू आहे. त्या संशोधनाची माहिती मराठी वाचकांना व्हावी म्हणून प्रसिद्ध विज्ञानलेखक निरंजन घाटे यांनी यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे पुस्तक लिहिले आहे.

इ. स. १९२१ मध्ये कॅरेड चॅपेक या झेकोस्लोवाकियन लेखकाने रोस्सम्स युनिव्हर्सल रोबॉटस - (आर यू आर) तारकात रोबो हा शब्द प्रथम वापरला. या नाटकातले रोबॉट हे यंत्रमानव माणसाला कष्टाची वापरणारी कामे करीत. गुलाम म्हणून राबत. तेव्हा त्या यंत्रमानवांचे मालक आळशी बनू लागले. त्यामुळे चिडलेले यंत्रमानव या आपल्या आळशी मालकांना बंदिवान करून, मानवी संस्कृतीच उद्ध्वस्त करतात असा या नाटकाचा विषय होता. या नाटकाने युरोपमध्ये एकच खळबळ उडवली. यंत्रसंस्कृतीने भावी काळात काम अनर्थ उद्भवेल याचा ही झलक अनेक विचारवंतांची झोप उडवणारी ठरली. अर्थात ही कल्पना तशी नवी नव्हती.

इ. स. पूर्व चौथ्या शतकात ग्रीसमध्ये यंत्रमानवाची कल्पना मांडण्यात आली होती. ॲरिस्टॉटलने आज्ञाधारक अवजाराची कल्पना सांगून मुकादमाला नोकराची व माणसाला गुलामाची गरज उरणार नाही असे भाकीत केले होते. १७६९ मध्ये बॅरल वुल्फगँग फॉन केंपेलेन याने एक स्वयंचलित बुद्धिबळपटू तयार केला. १८१७ साली मेरी शेली हिने फ्रँकेनस्टाइन ही कादंबरी लिहिली. शास्त्रज्ञ एखादा सैतान कसा निर्मू शकेल हे त्या विज्ञानकथेद्वारे तिने प्रथम दाखवले. विज्ञानकथाकारांची या कल्पनेभोवती अनेक कथानके रचली.

ॲसिनोव्ह यांनी रोबॉटिक्स या शास्त्रज्ञाची पद्धतशीर मांडणी केली. रोबॉटच्या वर्तनाबाबत त्यांनी तीन नियम घालून दिले.

(१) यंत्रमानव मानवाला (मालकाला) अपाय होईल अशी कुठलीही कृती करणार नाही, किंवा आपल्या कृतिशून्यतेमुळे तो मानवाला अपाय होऊ देणार नाही.
(२) पहिला नियम पाळूनच तो मानवाने दिलेल्या आज्ञा कृतीत आणील.
(३) वरील दोन्ही नियम पाळून तो स्वतःचे रक्षण करील.

१९६०नंतरच्या काळात यंत्रमानवांचा उपयोग कारखान्यात आणि अणुभट्ट्यात सर्रास होऊ लागला. संगणक, व्हिडिओ कॅमेरे, अभियांत्रिकीचे अचूक संयोजन याद्वारे यंत्रमानव गुंतागुंतीची नाजूक कामे पार पाडू लागला. अंतरिक्षयानात त्यांचा वापर होऊ लागला. १९५०मध्ये डब्ल्यू ग्रे वॉल्टर याने टॉरटाइज या सोप्या यंत्रमानवाची निर्मिती केली.

१९५८मध्ये जे. एफ. एंजलबर्गर याने प्रथम यंत्रमानव बनवला. १९६१ मध्ये जनरल मोटर्सच्या निर्मिती विभागात यंत्रमानवांचा वापर सुरू झाला. १९७६ साली व्हायकिंग लँडरने मंगळाच्या पृष्ठभागावरील खडक व माती यांचे पृथक्करण केले.

एंजलबर्गरचे संशोधन, सहा पायांचे मॅकघीने तयार केलेले यंत्र, मार्क रेबर्ट याचे संशोधन, (पोगोस्टिक), जीवननुकरणशास्त्राचा उपयोग, मोलेक्युलर (रेण्विक) संगणक व यंत्रमानव, सूक्ष्म यंत्रमानव (मायक्रोवॉटस) याबद्दलही निरंजन घाटे यांनी सविस्तर माहिती दिली आहे. एका नव्या ज्ञानशाखेतील हा फेरफटका रोमांचकारक वाटेल.

**पृष्ठे ५६. पंचवीस रुपय**

---

## जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांच्या गमतीजमतीच्या गोष्टींचा खजिना

---

# कथारूप वैज्ञानिक

---

**किशोर कुलकर्णी**

शास्त्रज्ञांची नावे अजरामर होतात. त्यांचे शोध मानवी जीवनावर विविध परिणाम करतात. त्या शोधांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती तेजोवलये निर्माण झाल्यासारखे वाटते.

पण हे सारे शास्त्रज्ञ शेवटी माणूसच असतात. इतर सर्वसामान्य माणसाप्रमाणेच त्यांना रागलोभ असतात. सुखदुःखे जाणवतात, मान-अपमान पचवावे लागतात. विशिष्ट क्षेत्रात त्यांचे संशोधन वाखाणले जात असले तरी इतर क्षेत्रांबद्दल त्यांना पूर्ण माहिती असतेच असे नाही. त्यामुळे त्यांच्या त्याबाबतच्या अडाणीपणाचेही किस्से मिटक्या मारत सांगण्यात येतात. साध्या गोष्टीतूनही नवीन शोध लावण्याचे त्यांचे बुद्धिकौशल्यही कौतुकाचा विषय होते. आर्किमिडीजला टबमध्ये स्नान करीत असतानाच सोन्याच्या मुकुटातील भेसळ शोधण्याची युक्ती गवसली आणि तो तसाच उघडाबंब अंगाने रस्त्यावर युरेका, युरेका (सापडले, सापडले) म्हणत आनंदाने पळत सुटला. यासारख्या आख्यायिका लोकांना आकृष्ट करतात.

किशोर कुलकर्णी यांनी शास्त्रज्ञांच्या अशा गमतीदार गोष्टींचे संकलन 'कथारूप वैज्ञानिक' या पुस्तकात केले आहे. शास्त्रज्ञ यात संशोधक म्हणून भेटतात तसेच माणूस म्हणूनही भेटतात. संशोधकापेक्षा त्यांचे मानवी स्वभावाचे कंगोरे कधी कधी मनाचा जास्त ठाव घेतात.

अल्बर्ट आइन्स्टाइन याला १९२२ साली नोबेल पुरस्कार मिळाला. तो त्याच्या सापेक्षतावादाच्या सिद्धान्ताबद्दल न मिळता, १९०५ साली बर्न येथे असताना केलेल्या फोटो इलेक्ट्रिक सेल क्रियेसंबंधी मिळाला, त्याचे त्याच्या पत्नीला आश्चर्य वाटले. त्यावर आइनस्टाइनने तिची समजूत घालताना म्हटले, ''अजून तरी सापेक्षता सिद्धान्ताने मानवजातीचा फायदा झालेला नाही. पण फोटो इलेक्ट्रिक सेलमुळे विद्युत चक्षू, टेलिव्हिजन, कॅमेरे इत्यादी गोष्टी शक्य झाल्यात. तेव्हा हा पुरस्कार योग्यच म्हणायला हवा.''

जर्मनीचा एक भौतिक शास्त्रज्ञ रॉबर्ट करचॉफ यांने प्राध्यापक जीवनातले लेक्चर एकदाच चुकवले. तो दिवस होता त्याच्या लग्नाचा. शनिवारी लग्न, रविवारी मधुचंद्र, सोमवारी पुन्हा हा पठ्ठ्या वर्गात लेक्चर द्यायला हजर. आपण शनिवारचा दिवस बुडवला - म्हणून त्याला जन्मभर खंत वाटत होती !

टामको ब्राहे हा खगोलशास्त्रज्ञ. तारकांचे अचूक निरीक्षण नोंदवून त्याने आधुनिक खगोलशास्त्राचा पाया घातला. त्याला दुसऱ्यांच्या भांडणात मध्यस्थी करायला फार आवडे. एकदा एका सरदाराशी त्याचे द्वंद्वयुद्ध झाले. त्यात टामकोच्या नाकाचा शेंडा तलवारीच्या वाराने उडवला गेला. सोन्याचांदीच्या मिश्र पत्र्याने नाकाचा शेंडा आच्छादून त्याला पुढे जगावे लागले.

रेडिओ, टेलिग्राफिक यंत्र, ध्वनिमुद्रणयंत्र, विजेचा दिवा वगैरे शोध लावणाऱ्या एडिसनच्या नावावर एक हजारावर पेटंटस होती. त्याचे व अमेरिकन पेटंट ऑफिसचे नेहमी वाद होत.

आयझॅक न्यूटनने प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका हा ग्रंथ लिहिला. त्याचा प्रतिस्पर्धी रॉबर्ट हूक या शास्त्रज्ञाने त्यावर टीका करू नये म्हणून न्यूटनने इ.स. १६७२ मध्ये लिहिलेला हा ग्रंथ १७०४मध्ये प्रसिद्ध केला, रॉबर्ट हूक मरण पावल्यावर.

असे किस्से वाचताना मानवी मनाचे कितीतरी पैलू ध्यान्यात येतात.

**पृष्ठे ११२. पंधरा रुपये**

## व्हिडिओफोन, ई मेल, संगीत लायब्ररी, टेलिटेक्स्ट याद्वारे संदेशवहनाच्या गतीत झालेली अपूर्व वाढ

# माहितीचे महामार्ग

**के. डी. पावटे**
**अनु. वैशाली जोशी**

सध्याचे युग हे माहितीचे युग आहे. माहिती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्याचे नवनवे मार्ग शोधले जात आहेत. टेलिव्हिजन, रेडिओ, तारायंत्र, टेलेक्स, फॅक्स, संगणक यामुंळे संदेशवहनात क्रांती घडून आली आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटना आपण आपल्या खोलीत बसून टेलिव्हिजनच्या छोट्या पडद्यावर पाहू शकतो. राष्ट्रपती भवनातील परदेशी पाहुण्यांचे स्वागत, चंद्रावर उतरलेले मानवरहित यान, एखाद्या कोसळणाऱ्या विमानाने घेतलेला पेट आणि त्याचा झालेला स्फोट, आपल्या डोळ्यासमोर या घटना घडताहेत असे वाटते. आपली खुर्चीही न सोडता जगाचा फेरफटका आपण करून येऊ शकतो. आधुनिक संदेशवाहनाच्या साधनांची ही किमया अभूतपूर्व आहे.

डॉ. के. डी. पावटे यांनी लिहिलेले इन्फर्मेशन हायवेज् नावाचे पुस्तक भारत सरकारच्या प्रसिद्धी व माहिती संचालनालयाने प्रसिद्ध केले आहे. त्याचा हा मराठी अनुवाद वैशाली जोशी यांनी केला आहे.

दळणवळण, तारसंदेश, रेडिओलहरी, टेलिव्हिजन संदेश, फॅक्सिमिली टेलिग्राफी (फॅक्स), ई-मेल, टेलिटेक्स्ट, व्हिडिओटेक्स, मॉडेमचा वापर, याद्वारे आज संदेशवहनाची प्रभावी साधने हाती आली आहेत.

संदेशवहनाचा आरंभीची साधने ॲनॅलॉग संदेशासाठी बनवली गेली होती. आता त्या ॲनॅलॉग स्पंदनांचे रूपान्तर डिजिटल स्पंदनात करण्यावर भर आहे. संदेशवहन चॅनेलमध्ये किंवा माध्यमात समअक्ष तार, ऑप्टिकल धागे, पिळलेल्या तारांची जोडी, सूक्ष्मलहरी दुवे यांचा वापर केला जातो. संदेशवहन चॅनेलचे डिजिटल व ॲनॅलॉग असे वर्गीकरण केले जाते. संदेशवहनासाठी आधारपट्ट्या व रुंद पट्ट्या (बेस बँड, ब्रॉड बँड) यांचा वापर होतो. अनावृत्त तारांवरून पाठवले जाणारे तारायंत्रांचे संदेश हे आधारपट्टा प्रक्षेपणाचे उदाहरण, तर टीव्ही आणि दोन संगणकांकडून एकमेकांकडे होणाऱ्या संदेशवहनासाठी रुंद पट्टा असणाऱ्या समअक्ष तारा (केबल्स) वापरल्या जातात. रुंद पट्टा रुंदीची आवश्यकता असणारे संदेश व्हीएचएफ (सूक्ष्मलहरी) वाहकांवरून पाठवले जातात. प्रक्षेपण करणाऱ्या व ग्रहण करणाऱ्या तबकडी अँटेना उंच मनोऱ्यावर असतात. क्लिस्ट्रॉन्स या खास जनित्राद्वारे सूक्ष्मलहरींची निर्मिती केली जाते. भूस्थिर उपग्रहांचा वापर करून आंतरराष्ट्रीय दळणवळण करता येईल असे १९४५ साली आर्थर क्लार्क याने सुचवले होते. नंतर अनेक वर्षांनी कृत्रिम उपग्रह सोडून ती कल्पना पुढे रशिया-अमेरिकेने प्रत्यक्षात आणली. सध्या अवकाशात अनेक भूस्थिर उपग्रह असून ते विविध कामांसाठी वापरले जातात. इन्सॅट हा भारताचा राष्ट्रीय उपग्रह असून कर्नाटकातील हसन येथे त्याचे नियंत्रक केंद्र आहे.

तंतू-ऑप्टिकल संदेशवहनात 'संपूर्ण अंतर्गत परिवर्तन' क्रिया ही केंद्रवर्ती असते, जॉन टीन्डॉल या ब्रिटीश शास्त्रज्ञाने पाण्याच्या ओघातून प्रकाश परावर्तित केला जाऊ शकतो, हे गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाखाली पाण्याचा फवारा परिवलयाचा मार्ग अनुसरत असल्याने प्रकाशही त्याच मार्गाने वळतो असे दाखवून दिले. त्या संशोधनाचा उपयोग करून शंभर वर्षांनी ऑप्टिकल दळवळण पद्धती विकसित केली गेली. १९६० मध्ये विमानातही निर्वेधपणे कार्य करण्याची क्षमता यामुळे अधिक सोयीस्कर ठरतात. अटलांटिक पार करणारी पहिली तंतू ऑप्टिकल तार १९८८ मध्ये कार्यरत झाली. ती एका वेळी ४० हजार टेलिफोन्स कॉल्स वाहून नेऊ शकते. ऑप्टिकल तंतूंचे मल्टी मोड स्टेप इंडेक्स, सिंगल मोड़ ग्रेडेड इंडेक्स हे प्रकार असून प्रक्षेपणाच्या अपेक्षित वेगाप्रमाणे त्यांचा वापर केला जातो.

संदेशवहनासाठी नेटवर्क (जाळे) ही कल्पना आता रूढ झाली असून, त्या जाळ्याचे टर्मिनल, चॅनेल्स, एक्स्चेंजेस, सिग्नलिंग आणि टोपोलॉजी या पाच गोष्टींची त्यासाठी गरज असते. लोकल एरिया नेटवर्क, पब्लिक डाटा नेटवर्क, इंटिग्रेटेड सर्व्हिसेस डिजिटल नेटवर्क, निकनेट वगैरे प्रकारांचीही माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे.

संदेशवहनाच्या वेगामध्ये या सर्व संशोधनाने मोठीच वाढ झालेली आहे. पूर्वीपत्र पाठवायला घोडागाडीला १० दिवस लागत, रेल्वेला १० तास लागत, त्याच प्रवासाला आता टेलिग्राफने चार मिनिटे, टेलेक्सने दोन मिनिटे, टेलिफोनने तीस सेकंद आणि इलेक्ट्रॉनिक मेलने एक दशांश सेकंद लागतो.

व्हिडिओफोन, संगीत लायब्ररी, रेडिओ, टेलिफोन, टेलिव्हिजन, टेलिटेक्स, ई मेल, संगणक या सर्वांद्वारे होणाऱ्या संदेशवहनाच्या माऱ्यामुळे आपण कितीही ज्ञान मिळवले तरी ते अपुरेच आहे, माहितीच्या महामार्गावर सतत वावरूनही आपण अडाणीच आहोत - असे क्षणाक्षणालाच जाणवत राहणार आहे.

**पृष्ठे १०८. सत्तर रुपये**

आता माणसे माणसाशी
लढताहेत असे
युद्ध होणार नाही.

# आधुनिक युद्धसाधने

**निरंजन घाटे**

शिवरायांनी गनिमी तंत्राने मोगलांना बेजार केले. दुसऱ्या महायुद्धात दोन कोटी सैनिक लढता लढता मरण पावले.

यापुढची युद्धे मात्र माणूस माणसाशी लढतोय अशी असणार नाहीत. दूरवर बसून बटन दाबून शत्रूवर शस्त्रास्त्रांचा, अण्वस्त्रांचा, प्राणघातक अस्त्रांचा मारा केला जाईल. इलेक्ट्रॉनिक युद्धसाधनांचा पुढे जास्त प्रभाव राहील. एकूणच युद्धाचे तंत्र यापुढे आमूलाग्र बदलणार आहे.

निरंजन घाटे यांनी या नव्या युद्धसाधनांची अत्यंत वेधक व दुर्मिळ माहिती आधुनिक युद्धसाधने या पुस्तकात संकलित करून, या नव्या संशोधनाचा व्यापक पट उलगडून दाखवला आहे.

दूरनियंत्रित बोंब, कमी व मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे, पाणबुड्या, अवॅक्स (एअरबोर्न वॉर्निंग ॲड कंट्रोल सिस्टिम्स), हेलिकॉप्टर्स, अदृश्य लढाऊ विमान (नाइट हॉक, आण्विक, सूक्ष्मजीव व रासायनिक युद्ध (एन.बी.सी.) रणगाडे, स्नायपर रायफल, ग्लॉक पिस्तूल (१५०० गोळ्या झाडूनही निकामी न होणारी नळी हे याचे वैशिष्ट्य. २५ मीटरवरील लक्ष्याचा वेध ती करू शकते), इलेक्ट्रॉनिक यंत्रणा, रडार प्रतिबंधक यंत्रणा, उपग्रहांचे युद्ध, चुंबकीय तोफा, स्टिंगर क्षेपणास्त्र, टो-रणगाडारोधक अस्त्रे अशा अनेक साधनांची माहिती निरंजन घाटे यांनी देऊन थोडक्यात त्यांची वैशिष्ट्ये प्रकट केली आहेत. त्यामुळे हे पुस्तक खूपच उपयुक्त वाटेल.

या युद्धसाधनांबरोबरच शस्त्रास्त्रांची वैध व अवैध मार्गाने विक्री आणि लष्करी हेरगिरी यांचीही निरंजन घाटे यांनी दिलेली माहिती खूप उद्बोधक वाटेल. शस्त्रास्त्रांचा चोरटा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालतो. त्यांच्या व्यापारावर मिळणारा पैसा हा सोन्याच्या चोरट्या व्यापारापेक्षाही जास्त असतो. (मादक द्रव्यांच्या विक्रीचा कदाचित अपवाद ठरेल.) कुठल्याही राष्ट्राला स्वत:च्या भूमीवर युद्ध नको असते. दुसऱ्या राष्ट्रात युद्ध झाले तर शस्त्रास्त्रउत्पादक देश खूश असतात. कारण या शस्त्रास्त्रविक्रीतून त्यांना भरपूर कमाई होत असते. अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, फ्रान्स, इटली, जर्मनी, स्वीडन, स्वित्झर्लंड, स्पेन, बेल्जियम, इस्राएल, दक्षिण आफ्रिका हे देश शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत आघाडीवर आहेत. शस्त्रास्त्रांच्या प्रमुख विक्रेत्यांमध्ये फाब्रिक नॅशनल (बेल्जियम), कॉग्जवेल्ड ॲंड हॅरिसन (लंडन), पार्करहेल (बर्मिंगहॅम), बोफोर्स (स्वीडन), ओएर्लिकॉन (स्वित्झर्लंड), सेत्मे (स्पेन), वेर्नर (जर्मनी), ऑम्नीपोल (झेकोस्लोव्हाकिया) आणि फिॲट (इटली) यांच्या समावेश होता. शेरवुड इंटरनॅशनल एक्स्पोर्ट कॉर्पोरेशनचा मालक मायकेल कोकीन याने म्हटले होते, ''दहा हजार सैनिकांना माझ्यापुढे आणा. त्यांना लगेच मी लष्करी गणवेश, शस्त्रास्त्रे, वाहने, हेलिकॉप्टर्स, उखळी तोफा, फिरता धोबीघाट, स्वयंपाकघर यासह युद्धाला सज्ज करीन.''

अदनान खशोगी या सौदी अरेबियन शस्त्रास्त्रविक्रेत्याचेही नाव वृत्तपत्रात गाजत राहिले होते. त्याने अमेरिकेची शस्त्रास्त्रे इराणला विकण्यात मोठी चलाखी दाखवली. ''मी प्रत्यक्ष युद्धभूमी पाहून कोणाला यशाची गरज आहे ह्याची पाहणी करून त्याप्रमाणे शस्त्रे पुरवतो'' असे युनायटेड इंडस्ट्रीजचा प्रमुख सोधर्नेलिमन हा सांगतो. दरवर्षी तो १ अब्ज डॉलर्सचा धंदा करतो.

युद्धे का होतात? मानवी मूर्खपणामुळे. मानवी दोष, अहंकार, चुका, अभिमान, स्पर्धा यामुळे. स्वत:बद्दलच्या भ्रामक कल्पनांमुळे. त्यामुळेच शस्त्रास्त्रांच्या व्यापाराला मरण नाही, असे म्हणावे लागते.

**पृष्ठे १५०. पासष्ट रुपये**

**संगणकावाचून पूढे पानही हलणार नाही**

# गणकयंत्राचे अंतरंग

**चंद्रसेन टिळेकर**

संगणकांचा द्रुत गतीने आपल्या एकूण जीवनावर प्रभाव पडत चालला आहे. रेल्वेचे आरक्षण, वैद्यकीय तपासणी, मुद्रण-प्रकाशन, हिशेब, व्यापार व्यवहार, कारखान्यातील उत्पादन, संदेशवहन, चित्रीकरण, अंतरिक्ष उड्डाण - असे एकही क्षेत्र नाही की जेथे संगणकाचा उपयोग केला जात नाही.

आता यापुढे लहानपणापासूनच संगणक हाताळण्याची सवय मुलांना लागायला हवी, तरच ती जीवनात यशस्वीपणे उभी राहू शकतील.

संगणकाची माहिती ही शालेय वयातच करून घ्यायला हवी. त्या दृष्टीने सोप्या भाषेत माहिती देणाऱ्या पुस्तकांची गरज आहे. चंद्रसेन टिळेकर यांचे गणकयंत्राचे अंतरंग हे पुस्तक याच दृष्टीने उपयुक्त आहे.

आरंभी गणकयंत्रांचा इतिहास देऊन, पास्कल, बॅबेज, डॉ. हावर्ड यांच्या प्रयत्नांची हकीकत सांगण्यात आली आहे. गणकयंत्रांच्या वेगवेगळ्या पिढ्यांतील प्रगतीचाही मागोवा त्यांनी घेतला आहे. दुसऱ्या पिढीत ट्रान्झिस्टरच्या शोधामुळे गणकयंत्रांची गती वाढली. तिसऱ्या पिढीत ट्रान्झिस्टरची जागा आयसी चिपने घेतली. चौथ्या पिढीत व्हेरी लार्ज इंटिग्रेटेड सर्किट्समुळे संगणक अधिक सक्षम झाले. गणकयंत्राचा आकार कमी कमी होत गेला. सुटसुटीत झाला.

गणकयंत्रात द्विमान पद्धती वापली जाते. दशमान पद्धतीत ९ पेक्षा अधिक अंक असूच शकत नाही. द्विमान पद्धतीत एकपेक्षा मोठा अंक येऊ शकत नाही. शून्य आणि एक या दोन अंकाद्वारे मोठ्या संख्याही व्यक्त करता येतात. गणकयंत्राचे मुख्य भाग मेमरी युनिट, सेंट्रल प्रोसेसिंग युनिट, इनपुट युनिट व आऊटपुट युनिट (प्रिंटर) हे असतात. या सर्व विभागांची माहिती स्वतंत्र प्रकरणात देण्यात आली आहे.

आऊटपुट विभागात लाइन प्रिंटर, डूम प्रिंटर, डॉट मॅट्रिक्स प्रिंटर यांची माहिती आली आहे. इंकजेट व लेसर प्रिंटर यांची त्यात नंतरच्या काळात भर पडली आहे. मॅग्नेटिक टेप, मॅग्नेटिक डिस्क, रीड-राइट हेडस, यांचाही आवक-जावक साधनात समावेश होतो.

संगणकासाठी अनेक भाषा तयार केल्या गेल्या आहेत. तसेच प्रोग्रॅमिंग करण्याच्याही विशिष्ट पद्धती आहेत. त्यांचीही ओळख या पुस्तकात थोडक्यात करून देण्यात आली आहे.

मराठीत संगणकविषयक पुस्तके फारशी नाहीत. त्यामुळे सोप्या भाषेत संगणकाची अंतर्रचना समजावून देणारे हे पुस्तक वाचकांना सोयीचे व सुटसुटीत वाटेल.

**पृष्ठे ९२. पन्नास रुपये**

---

**मानवाच्या अनैसर्गिक निर्मितीबद्दल संपूर्ण विचारांना चालना देणारी कहाणी**

# पृथ्वीवर माणूस उपराच

**डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी**

एरिक व्हॉन डॅनिकेन याने एक ग्रंथ लिहून देव म्हणजे अन्य ग्रहांवरील प्रगत जीव-अतिमानव हे अंतरिक्षयानाद्वारे पृथ्वीवर येत असत असे प्रतिपादन करणारे पुस्तक लिहिले. पृथ्वीवर मानव हा उपराच ही कल्पनाही त्याला पोषक अशीच आहे. ड्रायोपिथेकस हे सस्तन प्राणी, त्यांच्या उपजाती. ड्रायोपिथेकस पंजाबायपासून गलोरिला, ड्रायोपिथेकस जर्मनायपासून चिंपांझी व ड्रायोपिथेकस डार्विनायपासून मानव यांची निर्मिती झाली असे विकास सिद्धान्ताचे प्रतिपादन आहे. चतुष्पाद अवस्थेपासून द्विपाद अवस्थेपर्यंतचे स्थित्यंतर कसे घडले? ड्रायोपिथेकसचा मेंदू दीडदोनशे घनसेंटिमीटर आकाराचा तर माणसाचा मेंदू त्याच्या दहा पट मोठा. हे स्थित्यंतर कसे घडले? याबद्दलच्या प्रश्नांना अजूनही समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. तेव्हा एक कल्पना अशी की पृथ्वीवर माणूस हा परग्रहावरून आला असावा. तो येथे पृथ्वीवर निर्माण झालेला नसावा. अवकाशातून पृथ्वीवर येणाऱ्या अतिमानवांचा व येथील चतुष्पादांचा संकर घडून अतिबुद्धिमान माणसाची उत्पत्ती झाली असावी.

असे परग्रहावरचे प्रगत जीव पृथ्वीवर येऊन गेले याचे पुरावे म्हणून एरिक व्हॉन

डेनिकनने इंका संस्कृतीचा आधार घेतला. तेथील नाजका शहराच्या भग्नावशेषामध्ये सदतीस मैल लांब व दीड-दोन मैल रुंद अशी सरळ सपाट पट्टी आहे. या पट्टीवर जागोजाग चौरस, कमळ वा राक्षसी आकाराचे पक्षी अशा आकृती आहेत. इंकाचे हे रस्ते म्हणजे पूर्वीच्या अंतरिक्षयानाच्या उड्डाणासाठी तयार केलेल्या धावपट्ट्या असाव्या असा निष्कर्षही काढण्यात आला आहे. अँडीज पर्वतातील पिस्को या डोंगरावर लाल दगडांच्या कड्यावर आठशेवीस फूट उंचीचा प्रचंड त्रिशूळ आढळतो तो त्रिशूल अंतरिक्षातून येणाऱ्या देवदेवतांना विमानतळाचा अंदाज यावा म्हणून मुद्दाम उभारला असेल असेही प्रतिपादन केले जाते. इंकाचा कालखंड हा इ.स. पूर्व दोन हजार वर्षे मानला जातो. प्राथमिक आदिम अवस्थेतील माणसाला इतके सुबक काम करता आले नसते. अंतराळप्रवासी-देव पृथ्वीवर आले; अवकाश पोशाख, शिरस्त्राणे, त्यांना जोडलेल्या अँटेना वगैरे पाहून त्यावेळचे आदिम लोक घाबरले असतील. देव अंतरिक्षयानात बसून दूर गेल्यावर मानवांनी त्यांच्या आठवणींना चित्ररूप दिले असेल. किंवा त्याच अंतरिक्षवीरांनी ह्या धावपट्ट्या वा त्रिशूल यांची रचना केली असेल असे तर्क संभवतात.

इंका हे लोक स्वत:ला सूर्यपुत्र मानत. डोंगरमाथ्यावर १२२ मैल लांब व ३५ मैल रुंद असे सरोवर आहे. त्याला इंका लोक टिटिकाका (रानमांजर) म्हणतात. हे लोक रानमांजराची पूजा करीत. रानमांजराची शिल्पेही तेथे सापडतात. टायटम्बो येथील किल्ला प्रचंड आहे. प्रत्येकी दहा बारा टन वजनाच्या दगडांनी तो बांधला आहे. हे दगड सात मैलावरून नदी पार करुन आणले गेले आहेत. ते डोंगरावर कसे चढवले असतील? सुबकपणे एकमेकांवर कसे रचले असतील?.. हे काम परग्रहस्थ वीरांचेच असावे असा तर्क त्यामुळे पुढे केला जातो. टिटिकाका सरोवराच्या पाण्याखाली एक प्रचंड भिंत आहे. या भिंतीच्या रेषेत दहा मैल पुढे गेल्यावर इंका शहर तिह-वानाको लागते. या दुर्गम भागात शहर कोणी वसवले असा प्रश्न पडतो. तेथे चोवीस फूट उंचीची, वीस टन वजनाची देवतेची मूर्ती आहे. तेरा हजार फूट उंचीवरच्या पठारावर ही मूर्ती कशी आली? यावर दि ग्रेट आयडॉल ऑफ तिहावानाको हा ग्रंथ प्रसिद्ध केला गेला आहे. या मूर्तीवर असणाऱ्या सांकेतिकि खुणा कालमापनाशी संबंधित असाव्या असा तर्क आहे. पाषाणात कोरलेले सूर्यद्वारही या शहरात सापडले आहे.

गणिताचेही ज्ञान प्राचीन लोकांना असावे. सुमेरियन लोक खगोलशास्त्रात प्रवीण होते. चंद्राचा पृथ्वीभोवतीचा भ्रमणकाळ त्यांनी अचूक जाणला होता. इराकमधील जिनेव्हे टेकडीवरील गुहेत एक गणित भिंतीवर कोरून त्याचे उत्तर म्हणून १९५, ९५५, २००,०००,००० ही संख्या मांडलेली आहे. त्रिकोणाकृती खुणा कोरून क्युनिफॉर्म पद्धतीने लेखन केलेले सापडते. सुमेर राजांची ४ लक्ष ५६ हजार वर्षे राज्य केले असा उल्लेख आहे. सुमेरियन राजांनी अंतराळातून पृथ्वीवर येणाऱ्या अतिमानवी प्रवाशांसाठी पिरॅमिड बांधले - असे अनुमानही काही संशोधक करतात. पिरॅमिडचा एकेक दगड दहाबारा टन वजनाचा व गुळगुळीत आहे. २६ लाख असे पाषाण वापरले आहेत. म्हणजे हे काम किती प्रचंड असेल याची कल्पना



येईल. गिझा येथील दि ग्रेट पिरॅमिड हा बांधण्यासाठी ६६४ वर्षे लागली असतील असा अंदाज आहे. उष्ण वाळवंटात हे काम वीस वर्षात केले गेले असाही निर्देश आहे. यात डबर कुठेच नाही. या पिरॅमिडच्या कोणत्यातरी भागात विलक्षण किरणोत्सर्गी योजना कार्यरत असावी असे मत नोबेल पुरस्काराचे मानकरी डॉ. लुई अल्वारिज यांनी व्यक्त केले. पिरॅमिडच्या विशिष्ट आकारामुळे फळे दीर्घकाळ ताजी राहतात, दाढीचे पाते धारदार राहते हे लक्षात आल्यावर रेडिओ इंजिनियर कॅरेल ड्रबाल याने चिऑप्स ब्लेड शार्पनर या वस्तूचे पेटंट घेतले.

उत्तर मेक्सिकोतील माया संस्कृतीच्या लोकांना सौरगणित अवगत होते. त्यांच्या वेधशाळा प्रगत होत्या. सौरवर्ष ३६५ दिवसांचे होते हे त्यांना ठाऊक होते.

.... अशा अनेक तपशिलांमुळे हे पुस्तक आपल्या बुद्धीला झिणझिण्या आणणारे ठरेल.

**पृष्ठे ८२. पन्नास रुपये**

---

## भूतयोनी, मृत्यूनंतरचे अस्तित्व, स्वतःच्या शरीराबाहेर पडणे - हे सारे प्रकार खरे आहेत का?

# अद्भुत शक्तीचे मायाजाल

**आर्थर सी. क्लार्क**
**अनु. बाळ भागवत**

आर्थर सी. क्लार्क यांच्या 'दि वर्ल्ड ऑफ स्ट्रेंज पॉवर्स' या पुस्तकावर आधारलेल्या 'अद्भुत शक्तीचे मायाजाल' या लेखसंग्रहात मानवी बुद्धीला हुलकावण्या देणाऱ्या अतींद्रिय अशा घटनांवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. भारतीय परंपरेत तांत्रिक साधना, मंत्र, वर आणि शाप, जारणमारण, चेटूक, भानामती, करणी, जादूटोणा, मूठ मारणे, वगैरे गोष्टी जनमानसाने स्वीकारलेल्या आहेत. पुनर्जन्म, अतृप्त आत्म्याचे मत्यूनंतरचे अस्तित्व, भूतयोनी या गोष्टी गृहीत धरायला आपल्याकडचे बुद्धिवादीही सहजपणे तयार होतात. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा त्यामुळे हवा तसा प्रभाव पडू शकत नाही. वर्षानुवर्षे, पिढ्यानुपिढ्या काही गोष्टींचा सामूहिक नेणिवेतून झालेला स्वीकार - एकदम झिडकारून टाकणे सोपे नाही असे दिसून येते.

परंतु आधुनिक ज्ञान व विज्ञान परंपरेने संस्कारित झालेल्या पाश्चात्य देशांतही असे प्रकार घडल्याचे सांगण्यात येते आणि त्यांची नोंद ठेवली जाते. पाश्चात्य संशोधक अशा घटनांचा मागोवा घेऊन, त्यातील सत्यासत्यता पारखून घेतात; त्या गोष्टी विज्ञानाच्या चौकटीत बसू शकतात की नाही याची छाननी करतात आणि त्यांतील तथ्य लोकांपुढे ठेवतात. अर्थात तिकडेही काही माणसे थापा मारतात, खोटे दावे करतात; बनवाबनवी करतात, फसवणूक करतात, अर्धवट माहिती देऊन दिशाभूल करतात. परंतु त्याबद्दलही शहानिशा केली जाते; आणि अतिरंजित दाव्यांबद्दलची वस्तुस्थिती मांडण्याची जागरूक संशोधक शिकस्त करतात.

आर्थर सी. क्लार्क यांच्यासारखा आघाडीवरचा विज्ञानकथाकार आणि शास्त्रज्ञ या अद्‌भूत, गूढरम्य गोष्टींचा छडा लावण्यासाठी मिस्टेरियस वर्ल्ड, दि वर्ल्ड ऑफ स्ट्रेंज पॉवर्स यासारखी पुस्तके लिहितो, तेव्हा त्याबद्दल कुतूहल वाटतेच.

आपली आई पुढच्या गुरुवारी मरणार आहे, तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करून घ्या असे सांगत एक तरुणी एके रविवारी एका डच नर्सिंग होममध्ये १९६६ मध्ये आली. डॉक्टरांनी च्या तरुणीच्या आईची तपासणी केली. सत्तर वर्षे तिचे होते पण तिला कोणताच आजार झालेला त्यांना आढळला नाही. गुरुवारी त्या स्त्रीचे सगळे कुटुंब चर्चला जाताना घालतात तसा पोशाख करून नर्सिंग होममध्ये आले. दुपारी ती आई पलंगावर निजली. दीड वाजता तिची शुद्ध हरपली. डॉक्टर जवळ होते. सर्वजण तिच्यासाठी प्रार्थना करीत होते. साडेतीन वाजता ती मरण पावली. ''ह्रदयक्रिया बंद पडून मृत्यू'' असे डॉक्टरांनी कारण दिले. प्रश्न असा की त्या तरुणीला आपल्या आईचा मृत्यू गुरुवारी होणार हे आधीच कसे कळले?

आगामी संकटाची पूर्वसूचना काही वेळा मिळू शकते. भावी विमान अपघाताबद्दल तर अनेकांना असे पूर्वसंकेत मिळाल्याच्या घटनांची नोंद आहे. अमुक दिवशी वा वर्षी मरण आहे असे ज्योतिषांनी सांगितले तर त्यावर विश्वास ठेवणारे लोक आढळतात; आणि त्यावेळी मरण आल्याची उदाहरणेही आहेत. मृत्यूच्या भीतीनेही मरण ओढवते असे प्रो. केनेथ गोल्डन यांना आढळून आले. प्लासीबोचा, हिप्नॉसिसचा वापर करून हे कधी कधी भय दूर करता येते.

क्लेअरव्हायन्स (भावी घटनांच्या प्रतिमा डोळ्यासमोर दिसणे), प्रीकॉग्निशन, (पूर्वसंकेत) या गोष्टी काही व्यक्तींबाबत संभवतात असा याचा अर्थ होतो. लंडनमध्ये ब्रिटिश प्रिमॉनिशन्स ब्यूरो ही संस्था अशा घटनांची नोंद ठेवते.

१९६७ मध्ये दक्षिण जर्मनीतील रोझेनहाइम गावातील एका वकिलाच्या ऑफिसमध्ये सगळे फोन एकाच वेळी खणखणायला लागले. काही नंबरावर न फिरवताही फोन होत राहिले. टुयबलाइटस आपोआप सर्किटमधून बाहेर पडू लागल्या. परामानसशस्त्रज्ञ गूढविद्यासंशोधक डॉ. हॅन्स बेन्डर याला बोलावण्यात आहे. डॉ. बेन्डर यांनी त्या ऑफिसमधील एकोणिस वर्षे वयाची ॲन मेरी इनाइडर हिच्याकडे बोट दाखवले. तिने ऑफिसात पाय ठेवला की झुंबरे हेलकावत, भिंतीवरची चित्रे हलू लागत. डॉ. बेन्डरच्या मते ती पॉलटेरगाइस्ट म्हणजे खोडकर,



दंगलखोर प्रवृत्तीचा जीवात्मा होती. तिला डच्चू दिल्यावर हे सर्व प्रकार थांबले. अर्थात ॲनमेरीच्या बाबतीतच हे प्रकार का घडत होते हे स्पष्ट करता येत नाही. असे जीवात्मे कोठे जातील व कोणाला धरतील हेही सांगता येत नाही.

घरावर दगड पडणे हा प्रकारही जुन्या काळापासून चालत आला आहे. दगड पडल्याने गंभीर जखमी झाल्याची नोंद मात्र सापडत नाही. (पृष्ठ १५) घर बदलल्याने त्या कुटुंबाच्या बाबतीत हे प्रकार थांबवतात अशीही उदाहरणे आहेत. (पृष्ठ १६) कॅमेऱ्याने अशा प्रकारांचे फोटो घेण्याचेही प्रयत्न झाले. (१९)

युरी गेलर हा केवळ नजरेने चमचे वाकवी, स्पर्श न करता खोलीतील वस्तूंच्या जागा बदलून दाखवी, टेबल जमिनीवर अधांतरी तरंगत ठेवी. धातूच्या वस्तू वाकवी. दूरदर्शनवरही त्याने प्रयोग करुन दाखवले. (१९७३). त्याच्या या अफलातून प्रयोगातून सायकोकिनेटिक मेटल बेंडिंग ही नवीनच ज्ञानशाखा निर्माण झाली.

जेम्स रँडी या अमेरिकन जादूगाराने युरी गेलर हा हातचलाखीचे, नजरबंदीचे खेळ करतो असे म्हणून त्याला आव्हान दिले. त्याचा खोटेपणा उघडकीला आणला. (४४-४५). परंतु १९७९ मध्ये वॉशिंग्टन विद्यापीठात परामानसशास्त्राच्या अभ्यासासाठी मॅकडोनेल प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली. रँडीच्या दोन शिष्यांवर त्यात प्रयोग करण्यात आले. त्या दोघांची किल्ल्या वाकवून दाखवल्या. विचारप्रतिमा उमटवून दाखवल्या. सीलबंद ट्यूबमधल्या धातूच्या नळया वाकवून दाखवल्या. रँडीचे म्हणणे हे सर्व हातचलाखीचे प्रकार होते. संशोधकच या चाचणीत नापास झाले. या सर्व संशोधनाबद्दल संभ्रम निर्माण झाला. (४९)

लंडनमध्ये १८८२ साली सोसायटी फॉर सायकिकल रिसर्चची स्थापना झाली. झपाटलेल्या घरांचे संशोधन व भूतकथांचे संकलन यासाठी स्वतंत्र समित्या नेमण्यात आल्या. अनेक प्रकरणांच्या नोंदी या समित्यांनी केल्या. अँड्र्यू लँग हा संशोधक म्हणतो, ''भुतांबद्दल एकाच गोष्टीची खात्री देता येईल. ती दिसतात.'' (६२)

टेलिपथी अस्तित्वात आहे हे सिद्ध करण्यासाठी सी. जी. जंग या मानसशास्त्रज्ञाने अमेरिकेच्या लष्करात एक चमत्कारिक कॉंट्रॅक्ट मिळवले. हिप्नॉसिसचा वापर युद्धात अस्त्र म्हणून करता येईल का यावर संशोधन केले. ऱ्हाइन व जे. ग्रेथर प्लॅट यांनी टेलिपथी ही विज्ञानाची एक शाखा आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्यावर सर्वत्र टीकाच झाली. (७४)

परलोकविद्या हे शास्त्रही मृतात्म्यांशी काही माध्यमांद्वारे संपर्क साधता येतो या विश्वासावर उभे राहिलेले आहे. (९८) 'ज्या आत्म्याची अपेक्षा असते ते न येता घूसखोरी करून दुसरेच कुठले आत्मे बैठकीच्या वा प्रयोगाच्या वेळी येतात असेही दिसते (१०८) मृत्यूनंतर काही व्यक्तींनी संपर्क साधल्याची उदाहरणेही आढळतात.(१०९) पूर्वजन्माच्या स्मृती सांगणाऱ्या काही व्यक्ती भेटतात. 'क्रीप्टोम्नेशिया' द्वारे हिप्नॉसिसचा वापर करुन पूर्वजन्मातील घटनांचा

शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. (१२१)

जोन ग्रँट या लेखिकेने आपल्या पूर्वजन्मांवर आधारलेला अनेक कादंबऱ्या लिहून एकेकाळी प्रचंड खळबळ माजवली. १९३७ मध्ये तिने 'विंग्ड् फॅरोह' ही कादंबरी लिहिली. तीन हजार वर्षांपूर्वी इजिप्तच्या फॅरोह राजाची कन्या-सेकिता-म्हणून आपण अस्तित्वात होतो असा दावा करून तिने त्यावेळचे वातावरण उभे केले आहे. ''माझ्या सात कादंबऱ्या - म्हणजे माझीच पूवजन्मीची आत्मचरित्रे आहेत'' असे तिने म्हटले आहे. (१२६)

आपल्या शरीरातून आपण अल्पकाळ बाहेर पडू शकतो, दूरवर जाऊन येऊ शकतो का? 'आऊट ऑफ बॉडी एक्सपेरियन्सेस' आत्मपरिक्षण हेही एक चकित करणारे प्रकरण आहे. अशी हजारो उदाहरणे डॉ. रॉबर्ट क्रूकॉल या ब्रिटिश संशोधकाने जमा केली आहेत. 'स्वत:च्या शरीरातून मुक्त होण्याचे, प्रतिकृती अलग होण्याचे अनुभव येण्यासाठी विशिष्ट परिस्थिती लागते, विशिष्ट प्रकृती लागते असेही नाही. अचानक हा अनुभव येतो. अपघात, मानसिक धक्का ही कारणेही पुरतात. इच्छेनुरूप हा अनुभव घेता येतो असे त्याबाबत आढळते.

पाश्चात्य लोक व संशोधक अशा अतीद्रिंय गोष्टींची नोंद ठेवून, त्यांचा खरेखोटेपणा पारखून घेण्याचा प्रयत्न वर्षानुवर्षे करीत आहेत. परंतु निर्णायक असा काही निष्कर्ष अजूनही त्यांना काढता आलेला नाही. असे प्रकार घडतात; पण त्यांची कार्यकारणपरंपरा सिद्ध करता येत नाही. तरीही आपला अभ्यास त्यांनी थांबवलेला नाही.

**पृष्ठे १४४. सत्तर रूपये**


## निवेदन

**ग्रेसच्या साहित्यावरील लेखांचे संकलन**

मराठी भाषेमध्ये आपल्या लेखनशैलीद्वारा एक आगळा-वेगळा ठसा ज्यांनी उमटविला आहे त्यामध्ये कवी ग्रेस (म्हणजेच प्रा. माणिक गोडघाटे) यांचे नाव अग्रस्थानी आहे. विविध नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे आणि समीक्षात्मक पुस्तकांतून ग्रेसच्या विविध पुस्तकांवर प्रसिद्ध झालेल्या चर्चात्मक, समीक्षात्मक, रसग्रहणात्मक आणि टीकात्मक अशा लेखांचे एकत्रित संकलन करून ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध करावे असा मनोदय आहे.

आपल्या संग्रही ग्रेसवरील लेखन असल्यास वा आपण स्वत: या विषयावर काही लेखन केले असल्यास त्याची एक प्रत पाठवावी.

पत्ता : **श्रीनिवास वारुंजीकर,** २००, प्रतापगंज पेठ, सावरकर मार्ग, सातारा-२.




# श्रद्धांजली

तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक प्रा. के. वि. बेलसरे दि. २ जानेवारी १९९८ रोजी कालवश झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांचा जन्म ८-२-१९०९ रोजी झाला. ते गोंदवलेकरमहाराजांच्या जेव्हा सान्निध्यात आले तेव्हा गोंदवलेकरमहाराजांनी त्यांना ज्ञानेश्वरी व तुकोबांची गाथा अभ्यासण्यास सांगितले.

बी. ए. च्या परीक्षेत उत्तम यश मिळाल्यावर त्यांना एलिफन्स्टन महाविद्यालयात फेलो म्हणून नेमण्यात आले. भारतीय व युरोपीय नीतिशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांनी एम. ए.ची पदवी मिळवली. सुरुवातीला मॅट्रिकच्या मुलांना शिकविण्याचे कामही प्रा. बेलसरे यांनी केले. पुढे सिद्धार्थ महाविद्यालयात त्यांची तत्त्वज्ञान विषयासाठी प्राध्यापक म्हणून निवड झाली. नंतर ते या विभागाचे प्रमुख होते. तेव्हापासूनच दर रविवारी त्यांनी ज्ञानश्वरीची एक-एक ओवी घेऊन तीवर दर रविवारी निरुपण करण्यास सुरुवात केली.

भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान हा शेवटपर्यंत त्यांच्या साधनेचा विषय होता. या विषयावर, संतसाहित्यावर त्यांनी जवळपास २४ ग्रंथ लिहिले. संमर्थ रामदासांच्या दासबोधाचे त्यांनी केलेले संपादन मराठी माणसाच्या घराघरात पोहोचले. याशिवाय भगवद्‌गीता, अध्यात्मदर्शन, उपनिषदांचा अभ्यास, श्री गोंदवलेकरमहाराज चरित्र, श्री गोंदवलेकरमहाराज चित्रमाला, आनंदसाधना, साधकांच्या अभ्यासाची रूपरेषा, शरणागता, अंतर्यात्रा, प्रेमयोग, भगवंतांचे अनुसंधान, नामसाधनेतील अध्यात्म आणि तुकारामांची नामसाधना, नामसाधना परमार्थ प्रदीप, नामसमाधी सहज समाधी, भगवंताच्या नामाचे दिव्य संगीत, साधकांसाठी संतकथा, श्री ज्ञानदेवांचा हरिपाठ, मनाची शक्ती, ईश्वर स्वरूप आणि साक्षात्कार, श्री गोंदवलेकर महाराजांचे विचारसौंदर्य, संतांचे आत्मचरित्र, दासबोध, भावार्थ भागवत असे प्रा. बेलसरे यांचे अन्य ग्रंथ हे रसिक आणि अभ्यासक अशा दोघांकडूनही नावाजले गेले.

या विषयाचा अभ्यास, त्याबाबतचे लेखन याकडे प्रा. बेलसरे यांनी आयुष्यभर व्रत म्हणूनच पाहिले. या विषयाशी त्यांची इतकी बांधिलकी होती की त्यांनी कधीही आपल्या लेखनाचा मोबदला घेतला नाही.

आध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठ साधक प्रा. बेलसरे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी दुःख व्यक्त केले आहे. 'तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून कार्य केलेल्या श्री. बेलसरे यांनी आपले सारे आयुष्य आध्यात्मिकतेत आणि चिंतनात व्यतीत केले. गोंदवलेकरमहाराजांच्या पारमार्थिकतेचा वारसा त्यांनी समर्थपणे पुढे चालविला. त्यांच्या प्रवचनांना बुद्धिवादाचे अधिष्ठान लाभले होते. त्यांच्या निधनाने आपण एका ज्येष्ठ तत्त्वचिंतकाला मुकलो आहोत.' अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# फुले आणि काटे

**जुन्या पुस्तकांचे आकर्षण**

मला सेकंडहँड बुक शॉप्सना भेट देणे फार आवडते. त्यासाठी मी नेहमी वेळ काढतो. पुस्तके कमी किंमतीत मिळतात म्हणून नाही. तर मला जुनी पुस्तके आवडतात म्हणून. जुनी म्हणजे प्राचीन, दुर्मिळ पुस्तके नव्हेत. ती घेणे मला परवडणारही नाहीत. पण मला इतर व्यक्तींनी वापरलेली, हाताळलेली पुस्तके वाचायला आवडते. इतर व्यक्तींनी म्हणजे नामवंत, प्रसिद्ध व्यक्तींनी हाताळलेली पुस्तके असे नव्हे, तर सर्वसामान्य व्यक्तींनी हाताळलेली. काही वर्षे वापरात असलेली पुस्तके. जुनी वर्ल्ड क्लासिक्स मला आवडतात. मुद्रणदृष्ट्या ती आजच्यापेक्षाही सरस असत असे कधीकधी वाटते. या पुस्तकांमुळे मला स्मरणरंजनाचा आनंदही मिळत असेल. ही पुस्तके कोणाकोणाच्या नजरेखालून गेली असावीत याचा मी मनोमन शोध घेत राहतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचा ग्रंथसंग्रह विक्रीला काढला आहे असे कानावर येते तेव्हा मी त्या गावी जाऊन तो संग्रह न्याहाळतो. त्यातील पुस्तक मिळवतो... मी गेल्यावर माझ्या संग्रहातील पुस्तकांचीही तीच गत होईल कदाचित.... पण मला त्याची फिकीर नाही. मला जुनी पुस्तके बघायला, संग्रही ठेवायला आवडते हे खरे!

सर कीथ टॉमस (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतील मध्ययुगीन इतिहासाचे प्राध्यापक, आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे एक डेलिगेट म्हणून भारताला नुकतीच भेट दिल्यावर एका मुलाखतीत व्यक्त केलेले मत.)

**नावीन्य हवेय? विज्ञानविषयक लेखन वाचा.**

नवीन प्रतिमा आणि नवीन कल्पना यांचे माध्यम म्हणून कथाकांदबऱ्यांकडे मी पाहात नाही. आश्चर्य आणि नावीन्य आज हवे असेल तर ललितेतर साहित्याकडेच जायला हवे. आश्चर्य, नावीन्य, नव्या प्रतिमा व नव्या कल्पना या मला आजच्या विज्ञानविषयक लेखनात जास्त आढळतात. ललित साहित्यात नाही. अर्थात मी जीवशास्त्रज्ञ असल्याने माझा तसा अनुभव असू शकेल. तो एकांगीही असू शकेल. तथाकथित वास्तवाशी असणारा विज्ञानाचा संबंध स्पष्ट असतो; आणि तो लेखनातून प्रकट होतो. लेखनातून वास्तवाकडे - असा उलटा प्रकार तेथे नसतो. बहुतांश नवकाव्य हे कवितेपासून सुरू होते, जीवनापासून नाही. म्हणून १९९७ मधील माझे सर्वात आवडीचे पुस्तक हे कथाकवितेचे नसून, संसर्गजन्य रोगांचा इतिहास सांगणारे व्हायरस एक्स (फ्रँक रामन) हे आहे, असे नमूद करायला मला संकोच वाटत नाही.

- मिरोस्लाव होल्युब (झेक लेखक व जीवशास्त्रज्ञ)



**चरित्रनायकाची बाजू लढवा, पण -**

एखाद्या बॅरिस्टरप्रमाणे माझ्या चरित्रनायकाची बाजू मी ठसठशीतपणे मांडू शकतो. समोरचा प्रतिवादीही तितक्याच ठसठशीतपणे त्याची दुसरी बाजू मांडणार आह. हेही मी लक्षात ठेवतो आणि शेवटचा निर्णय जनमानसात होणार आहे; जनमताद्वारे तो प्रकट होणार आहे, आणि जनमत हे सतत बदलत असते याचेही भान मी ठेवतो. म्हणून आपल्या चरित्रनायकाची बाजू पुनः पुन्हा मांडत राहणे भाग पडते. ती मांडताना नवे मुद्देही विचारात घ्यावे लागतात. अर्थात आपण चरित्रनायकाच्या अभ्यासात इतका वेळ, विचार आणि भावना गुंतवलेल्या असतात की चरित्रनायकाची बाजू अतिरंजितपणे व भावनाप्राधान्याने मांडण्याचा मोहही होऊ शकतो. त्याचे महत्त्व व व्यक्तित्व फुगवून सांगण्याची इच्छा होऊ शकते. हा मोह शक्य तेवढा टाळणेच इष्ट. चरित्रनायकाच्या जीवनात आलेल्या दुय्यम व विरोधी व्यक्तिरेखा आणि त्याच्याशी संघर्ष करणाऱ्या मातबर व्यक्तिरेखा यांचीही बाजू व्यवस्थितपणे मांडून हा अतिरंजितपणा व एकांगीपणा टाळता येईल. तुमच्या चरित्रनायकाच्या विरोधकांची मते अशा दुय्यम व्यक्तिरेखांच्या द्वारे व्यक्त करणे सोयीचे ठरते. त्यामुळे चरित्र हे वादस्पर्धेचे व्यासपीठ ठरते, आणि वाचक स्वतःचा निष्कर्ष काढू शकतो. आपण एका वेगळ्याच विश्वात जाऊन आलो, आणि त्या अनुभवावर आपण काही निवाडा वरू शकतो - असे चरित्र वाचल्यावर वाचकाला वाटायला हवे. एखाद्या भूतकाळातील व्यक्तीवर आपण लिहीत असतो तेव्हा त्या व्यक्तीने वर्तमानकाळाला काही योगदान करावे अनेक अज्ञात स्थळांवर प्रकाश टाकावा, अशी अपेक्षा असते. मृत व्यक्तींचा प्राधान्यक्रम आपल्यापेक्षा भिन्न असतो. त्यांच्याशी व्यवस्थित संवाद साधला तर जिवंत समकालीन व्यक्तींकडून जे मिळणे अशक्य असते असे काहीतरी विशेष तुमच्या हाती लागू शकेल.

**न परवडणारा आदर्शवाद काय कामाचा?**

...आज असंही लक्षात येत आहे की सर्वसामान्य लोकांची करमणुकीची गरज बरीच वाढलेली आहे. त्यांच्या दृष्टीनं नव्या जगात जशी अनेक उपभोगाची साधनं येत आहेत, तसं साहित्य हेही चार घटका मौज करण्याचं साधन आहे. आपल्या वाचकांची ही अपेक्षा बऱ्याच लेखकांनीही मान्य केली आहे. बाजारात वाढलेली प्रकाशनांची संख्या अशा मागणीतूनही वाढलेली आहे. प्रत्येक गोष्टीचं चटपटीत सुलभीकरण करून आणि आपणच पूर्वी हाताळलेल्या तंत्रमंत्राचा वापर करुन लेखक आपापल्या प्रकाशकांच्या मागण्या पुरवीत असतात. आजच्या आपल्या वास्तववादी, व्यवहारवादी विचारसरणीत मूल्यांची ही झालेली उलटापालट आपल्याला खटकतही नाही, हे विशेष! उगीच न परवडणारा आदर्शवाद काय कामाचा असं बहुतेकांचं म्हणणं दिसतं.

- डॉ. सरोजिनी वैद्य

(मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलन - अध्यक्षीय भाषणातून. दि. १७-१-१९९८)

## पुस्तकाचे नाव सांगा - बक्षिस मिळवा

### स्पर्धेचा निकाल

डिसेंबर १९९७ अंकातील या स्पर्धेत अंकात देण्यात आलेल्या पुस्तक परिचयातील काही वाक्ये देऊन, ती कोणत्या पुस्तकाबद्दल आहेत हे ओळखण्यास सांगितले होते. या स्पर्धेतही अनेक जागरूक वाचकांनी भाग घेतला. अंकात समाविष्ट करण्यात यावयाची काही पुस्तके ऐनवेळी पृष्ठसंख्या वाढल्याने बाजूला ठेवावी लागली. परंतु या कोड्यात मात्र त्यांचा उल्लेख राहिला. तरीही या चाणाक्ष वाचकांनी त्याची नोंद घेऊन उत्तरे पाठवली या बद्दल विशेष कौतुक करायला हवे.

ही बरोबर उत्तरे पुढीलप्रमाणे

१) प्रा. वसंत कानेटकरांना प्रेक्षकांची नाडी चांगली सापडली आहे.
पुस्तक १ – मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे

२) पोलिसाच्या कुत्र्यांनो, हा तुम्हाला इशारा आहे.
पुस्तक २ – मी फूलनदेवी

३) आईनेही मला जवळ घेण्याऐवजी म्हटले, "तू मेली का नाहीस?"
पुस्तक ३ – मी फूलनदेवी

४) विकत घेतलेली बाहुली होती ती असे सारे म्हणतात.
पुस्तक ४ – संचित

५) हा प्रवास मनोरंजनार्थ नव्हता.
हे वाक्य कोणत्याही पुस्तक परिचयात आलेले नाही.

लॉट टाकून यशस्वी ठरलेल्या पुढील स्पर्धकांना प्रत्येकी १०० रुपयांची पुस्तके पाठवण्यात येतील. (त्यांनी आपल्या पसंतीचे पुस्तक कळवावे).

१) सौ. कल्पना प्र. चौधरी, एल बी ३१, व्हीएचबी, एल आय जी कॉलनी, राणी लक्ष्मी नगर, नागपूर ४४० ०२२.
२) सौ. माधवी भट, नेने कन्या विद्यालय, पेण (जि. रायगड)
३) सुलभा पुण्डे, घनश्याम दास पोद्दार विद्यालय, जे. बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई ५९.
४) ह. ल. भिसे, मु. पो. कळणे, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग, ४१६ ५११.
५) बळीराम रामचंद्र शिगवण, लिपिक, न्यू इंग्लिश स्कूल, वाशी तर्फ संगमेश्वर ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी ४१५ ६११

# वाचकांचा प्रतिसाद

गृहपत्रिका ही संकल्पना मराठी साहित्य व्यवहारात फारशी रुजलेली नाही. त्या दृष्टीने तुमच्या उपक्रमाचे विशेष उत्साहाने स्वागत करावेसे वाटते. त्यातही या गृहपत्रिकेचे स्वरूप बंदिस्त न ठेवता तुम्ही ते अधिक मोकळे ठेवले आहे. साहित्यपरिसरातील वेचक घडामोडींचा परामर्श घेऊन हेही आवर्जून नोंदावावेसे वाटते. १९९७ व १९९८ या दोन वर्षांची वर्गणी रु. १०० चेकने पाठवीत आहे.

***– पी. आर. जोशी घाटकोपर, मुंबई.***

---

आपल्या मासिकाचे अंक कॉलेजमध्ये वाचायला मिळाले. मराठीसाठीचा वाचकवर्ग वाढण्यासाठी हा उपक्रम नक्कीच उपयुक्त ठरेल. संपादकीय व पुस्तक परिचय विशेष आवडले. 'फुले आणि काटे' हे सदरही वेगळे, छान वाटले.

***– प्रा. एस्. डी. पाटील नेसरी, गडहिंग्लज***

---

डिसेंबर ९७चा अंक आवडला. त्याताल 'पुस्तक परिचय' या सदराखाली ठेवलेली नवीन स्पर्धा आवडली. विविध पुस्तकांची यादी वेचक व चांगली आहे. वि. स. खांडेकर यांना मिळालेले आरतीय ज्ञानपीठ प्रशस्तिपत्र वाचून एक वेगळीच प्रतिमा तयार झाली, ते प्रशस्तिपत्र मी जपून ठेवलेले आहे.

***– मल्लिकार्जुन शा. चनशेट्टी, वेळसंग***

---

जानेवारी १९९८चा 'ग्रंथजगत'चा अंक मिळाला. त्यांतल्या 'हिरकमहोत्सवी आयडियल', साहित्यवार्ता, पुस्तक परिचय, श्रद्धांजली, नवीन स्पर्धा, फुले आणि काटे, पुरस्कार इत्यादि स्तंभानी गजबजलेलं साहित्य वाचून अत्यानंद झाला.

***– व्यंकटेश ना. माणेकरी, सोलापूर***

---

'ग्रंथजगत'चे जेवढे कौतूक करावे तेवढे थोडेच. वाचकांच्या आवडीचे एकमेव मासीक आमचे ग्रंथालयाचे वाचकवर्ग ग्रंथजगतची उत्सुकतेने वाटच बघत असतात. खुप कमी कालावधीत अत्युच्च शिखरावर मजल मारुन वाचकांची ओढ आपल्याकडे ओढून घेवून नवोदीत लेखक, साहित्यिकांना प्रेरणादायी ठरलेले मासीक म्हणजेच 'ग्रंथजगत'.

***– अशोक प. धंदरे, ग्रंथपाल विवेकानंद वाचनालय, वासाळा, गडचिरोली***



# स्पर्धेचा निकाल

## पुस्तकांची नावे ओळखा - बक्षीस मिळवा

डिसेंबर १९९७ च्या अंकात एक चौकोन देऊन त्यात तेरा पुस्तकांची नावे बसवण्यात आली होती. पाचशेवर स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेत्तला. आश्चर्य म्हणजे त्यापैकी बहुतेकांनी उत्तरे बरोबर पाठवली. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी पुढील पाच स्पर्धकांना लॉट टाकून प्रथम आल्यामुळे बक्षीसे जाहीर करण्यात येत आहेत. आपल्याला हवी असलेली शंभर रुपये किंमतीपर्यंतची पुस्तके त्यांनी कळवावी. यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन. इतर स्पर्धकांनाही प्रचंड प्रतिसादाबद्दल धन्यवाद.

यशस्वी स्पर्धकांची नावे

१) कृष्णा विष्णू खाडे, मु. करंजवन, पो. थेरला, ता. पाटोदा, जि बीड ४१४ २०४.
२) सुरेश बबन गायकवाड, पो. कवठे, (येमाई) ता. शिरुर, जि. पुणे.
३) भगवान काशीनाथ मोहरे, मु.पो. मामाचे मोहिंदे, ता. शहादा, जि. धुळे, ४२५ ४०९.
४) भाऊराव बाबुराव बिडळे, ग्रंथपाल, बार्शी टेक्निकल हायस्कूल, जामगाव रोड, बार्शी ४१५ ४०१.
५) कु. कुंदा मारुती मोरे, सर्व्हे नं. ४४, केळेवाडी, सागर प्रोव्हिजन स्टोअर्सजवळ, पौड फाटा, पुणे ४११ ०३८.

**बरोबर उत्तर :**

| | | |
|---|---|---|
| १) मी फूलनदेवी | २) कालची स्वप्ने | ३) सायंकाल |
| ४) तारका | ५) मुरली | ६) अनुभव |
| ७) पर्व | ८) संचित | ९) फेरा |
| १०) साक्षी | ११) काचवेल | १२) घर |
| १३) शेकरा | | |

### *अभिनंदन*

गेल्या दोन वर्षांपासून दिला जाणारा **तुळसाबाई सोमाणी 'उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार'** या वर्षी **'पान पान जाळी झाले'** लेखक प्रमोद कोपर्डे या मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या पुस्तकास मिळाला. त्याबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन!

## लेखकांची नावे ओळखा.
## बक्षीस मिळवा !

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दे | ले | ग | ओ | पु | व |
| ने | सा | वं | त | द | बे |
| डे | पुं | ई | या | मे | ळिं |
| वी | प | शे | ला | मां | वा |
| हा | ळ | र | क | डे | खां |
| के | खे | द | डे | टे | घा |

शेजारच्या चौकोनात पंधरा मान्यवर लेखकांची नावे दडलेली आहेत. बरोबर उत्तरे देणाऱ्या स्पर्धकांपैकी तिघांना लॉट टाकून प्रत्येकी १०० रुची पुस्तके देण्यात येतील. आपली उत्तरे दि. २०-३-९८ पर्यंत आमच्या हाती यावीत. उत्तरे कार्डावर पाठवा.

चौकोन काढण्याची जरुरी नाही. कार्डावर आपला पत्ता पिनकोडनंबर सह सुवाच्य अक्षरात लिहा.

आमचा पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव, पुणे ३०.



◆ वर्ष दुसरे ◆ अंक दूसरा ◆ फेब्रुवारी १९९८

## अनुक्रम

| | |
|---|---|
| संपादकीय | २ |
| विज्ञानकथेची विविध रूपे | ४ |
| नवीन स्पर्धा | ७ |
| साहित्यवार्ता | ८ |
| अभिनंदन | १६ |
| पुस्तकपरिचय | १८ |
| श्रद्धांजली | ४१ |
| फुले आणि काटे | ४३ |
| शब्दकोडे | ५० |
| वाचकांचा प्रतिसाद | ५१ |
| एक आकर्षक ऑफर | ५२ |

◆ **कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

◆ **संपादन सहाय्य**
सुनीता दांडेकर

◆ **मांडणी**
बाबू उडुपी

◆ **या अंकाची किंमत ५ रु.**
वार्षिक वर्गणी ५० रु.

◆ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी

◆ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
फोन : ४७६९२४

**संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव, पुणे ३०.
**अक्षरजुळणी : पीसी-नेट,** नारायण पेठ, पुणे ३०.

या अंकातील लेखकांची मते ही ज्याची त्याची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

### चरित्रकारापुढचे आव्हान

चरित्र म्हणजे केवळ घटना-प्रसंगांची नोंद नव्हे. माहितीची जमवाजमव नव्हे. चरित्र हे त्यापेक्षा अधिक कलात्मक आणि कल्पक असते. चरित्राचा सांगाडा हा अर्थात पूर्णपणे सत्य घटना-प्रसंगांनी बनलेला असतो. पण त्या सांगाड्यात तुम्हाला रक्त आणि मांस भरावे लागते. त्यावर वस्त्रप्रावरणे चढवावी लागतात. त्यात पुन्हा प्राण भरावा लागतो. हे करण्यासाठी कल्पनाशक्ती लागते. करुणाबुद्धी लागते. चरित्रकार हा उपलब्ध वस्तूंची निरनिराळ्या प्रकारे संगती लावण्यात आपले कौशल्य पणाला लावतो. विशिष्ट आराखडा समोर ठेवून मी सुरुवात तर करतो, पण जरूर पडली तर नंतर त्या आराखड्याला धुडकावून लावून पुन्हा नव्याने सर्व मांडणी करण्याची माझी तयारी असते. बुद्धिबळपटूप्रमाणे आपल्या सोंगट्या पुढे कशा चालवायच्या आहेत याचे अवधान चरित्रकाराला ठेवावे लागते. उत्तर व्हिक्टोरियन काळातील कांदबऱ्यांप्रमाणे भरपूर पात्रे आणि समांतर उपकथानके चरित्रात रेखाटायला मला आवडते. त्या कादंबऱ्यांमध्ये काहीतरी मंत्रमुग्ध करणारी, जादूगिरी असे... कथाकथनातील जादू मी चरित्रात आणू पाहतो. मी कल्पनेने प्रसंग-घटना-व्यक्तिरेखांमध्ये चैतन्य आणतो. निवड करणे, काही ठोकताळे बांधणे मला आवडते. चरित्रनायकाच्या व त्याच्या अवतीभवतीच्या व्यक्तींच्या आंतरिक जीवनाचा अन्वयार्थ लावताना फँटसी आणि स्वप्न यांचाही वापर आजचा चरित्रकार करू शकतो. प्रत्यक्षात जगलेले आयुष्य रंगवताना, त्या व्यक्तीच्या दिवास्वप्नांची आणि आकांक्षांचीही झेप लक्षात घ्यावी लागते.... हे व्यवस्थित व्हावे म्हणून मी पुनः पुन्हा पुनर्लेखन करीत असतो. काही वेळा नऊ नऊ वेळा पुनर्लेखन केलेले आहे.

– (मायकेल होलरॉइड या चरित्रकाराच्या एका मुलाखतीतून. केंब्रिज युनिव्हर्सिटी.)

### मेख : माणसाच्या मेंदूतली !

माणसाची हिंसा, माणसाचं कौर्य यांचे वारंवार अनुभव आले की मला वाटतं, हे माणूसपण पुन्हा एकदा तपासून बघायला पाहिजे. आतापर्यंत माणूस म्हणून जे काम मानत आलो, गृहीत धरलं तेच कोसळतंय की काय असं वाटतं. मी निराशावादी नाही; पण हे आव्हान मात्र आहे. आर्थर कोएस्लरनं १९६३ मध्ये लिहिलेलं एक वाक्य आता मला फार मोलाचं वाटतं. तो म्हणतो, ''माणसाच्या मेंदूतच अशी काहीतरी मेख ठेवण्यात आली असावी की ज्यामुळे तो अधूनमधून वेड्यासारखा वागतो. कोएस्लर म्हणतो त्यात तथ्य असावं. माणूस जर असा अधूनमधून पिसाळणारच असेल तर शहाणी माणसं असं का वागतात, कारण नसताना दुष्ट वा क्रूर का होतात हे विचारण्यात आणि ते नाकारण्यात काय अर्थ आहे? आहे हे वास्तव आपण पत्करलं तर निदान पुढे काय करायचं हे बघू शकू. पाशवी प्रवृत्ती ही सगळीकडेच आहे. तुमच्यात आहे आणि माझ्यातही आहे. म्हणूनच माणूस आणि माणूसपण हे सगळंच पुन्हा एकदा तपासून बघायला हवं.''

– विजय तेंडूलकर (मुलाखत, साप्ताहिक सकाळ, १०-१-१९९८)



### मार्क्स-लेनिनचे आवडते ग्रंथालय

कार्ल मार्क्स आणि लेनिन यांनी जेथे बसून तास न् तास पुस्तके चाळली, ती लंडनच्या ब्रिटिश लायब्ररीतील ख्यातनाम राउंड रीडिंग रूम आता बंद करण्यात आली आहे. या लायब्ररीचे स्थलांतर झाले असून, ती आता किंग्ज क्रॉस स्टेशनजवळच्या सेंट पॅनक्रॉसजवळ गेली आहे. मार्क्स व लेनिन हे दोघे ०.७ या क्रमांकाच्या सीटवर बसत, ती सीट मात्र नवीन जागाही तशीच कायम ठेवण्यात येणार आहे.

मी इंग्लिशमध्ये काव्यरचना करतो, पण मी स्वतःला इंग्लिश पोएट मानत नाही. मी उडिया कवी आहे, असेच मी समजतो. प्रसंगी इंग्लिशचा मी वापर करतो एवढेच. माझ्या इंग्रजी कविता या एका अर्थाने माझ्या मूळ उडिया भाषेतील कवितांचा अनुवाद आहेत... कविता इंग्रजीत असली तरी ती भारतीय, प्रादेशिक जीवनाचाच आविष्कार करणारी असते, या अर्थाने मी इंग्रजीत लिहिणारा उडिया कवी आहे - असे मी आग्रहपूर्वक सांगू इच्छितो.

– आर. पार्थसारथी

### खांडेकरांचा जीवनादर्श

खांडेकरांनी स्त्री-पुरुष संबंधातच नव्हे तर एकूण सामाजिक सहजीवनावर भर दिलेला आहे आणि तो फडक्यांच्या व्यक्तिवादी जीवनदृष्टींवर प्रश्न उभा करणारा आहे. खांडेकरांना वर्गीय जाणिवांचे भान होते आणि मध्यमवर्गाला डीक्लास होण्याचे महत्त्व त्यांनी 'दोन ध्रुव' कादंबरीपासून सांगायला सुरुवात केली होती. खांडेकरांच्या कादंबऱ्या म्हणजे खऱ्या अर्थाने संस्कृती-टीकाच. भारतीय संस्कृतीतील जातिवाद आणि स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीतील संकुचितपणा - विरुध्द त्यांनी आवाज उठवला. सामाजिक व आर्थिक विषमतेची दुःखद आंतरिक जाणीव असणारा व व्यथित होणारा हा पहिला मराठी मानवतावादी लेखक होता. खांडेकर आदर्श व्यक्तिमत्त्वाचा शोध घेत होते. हा शोध 'ययाति' - मधल्या 'कच' या व्यक्तिरेखेच्या रूपाने साकार झाला. 'कच' हे खांडेकरांच्या आदर्श मानवाच्या शोधाचे 'व्हिजन' होते. संयम आणि भोग, वासना आणि प्रेम, भावना आणि बुद्धी, भौतिक सुख आणि आध्यात्मिक मूल्ये याच्यातील विवेकयुक्त समन्वय साधणारा कच खांडेकरांचा जीवनादर्श होता.

याचा अर्थ असा की जीवनासंबंधी आंतरिक व्याकुळतेचे चिंतन करणारा, माणसाच्या भयावह स्थितीसंबंधी कळवळणारा, सामाजिक व आर्थिक सर्व प्रकारच्या विषमतेमुळे व्यथित बनलेला, अंध धार्मिक रूढींच्या प्राबल्याने चिडून जाणारा, दलित शोषित व पीडित अशा मानवसमाजाबद्दल अपार करुणा बाळगणारा हा कलावंत आपल्या समकालीन लोकप्रिय वाङ्मयाच्या परंपरा तोडू शकला नाही आणि कथानिष्ठ प्रणयप्रधान रंजक कादंबरी यांच्या कैचीत सापडल्यामुळे महानतेच्या सोपानावर अधिक ताकदीने चढू शकला नाही. आपल्या प्रखर वास्तववादी जीवनजाणिवांसाठी आवश्यक त्या नव्या अनुभवांचे क्षेत्र धुंडाळू शकला

नाही. ही खांडेकरी वाङ्मयाची शोकान्तिका एकूण मराठी वाङ्मयाच्या विवेचनविशिष्ट काळातील स्वरूपावर प्रकाश टाकणारी आहे.

**मराठी वृत्तपत्रे ३७ टक्के लोक वाचतात**

भारतात वृत्तपत्र नियमितपणे वाचणाऱ्यांचे प्रमाण ४१ टक्के असून अधून मधून वाचणाऱ्यांचे प्रमाण १८ टक्के आहे. उरलेले ४१ टक्के लोक (त्यापैकी निम्मे अधिक साक्षर असूनही) वृत्तपत्रांच्या वाटेला जात नाहीत. असे नॅशनल रीडरशिप स्टडीज कौन्सिलच्या ताज्या पाहणीत आढळून आले. पाचशे गावातील १ लाख ३३ हजार व्यक्तींशी संपर्क साधून ही पाहणी करण्यात आली. दूरचित्रवाणी न बघणारे २१.७ टक्के लोक असून रडिओ कधीच न ऐकणारे लोक ७०.६ टक्के आहेत. ऐकणे, वाचणे व पाहणे यासाठी खर्च होणाऱ्या शंभर तासांपैकी ६९ तास दूरचित्रवाणी, १६ तास वृत्तपत्रे आणि १५ तास रेडिओ यासाठी वापरले जातात. मराठी भाषिक वृत्तपत्र वाचकांची संख्या ३४.७ टक्के असून, हिंदी वृत्तपत्रे वाचणाऱ्यांची संख्या १८.३ टक्के पडते. मराठी-गुजराती साहित्यिकांचा वाचक वर्ग वाढत आहे असेही या पाहणीचा एक निष्कर्ष आहे.

**आजच्या लेखनव्यवहाराबद्दलचे काही प्रश्न**

...अनेक चळवळी आहेत, पण त्यांचं फळ दर्जेदार उत्तम साहित्यनिर्मितीच्या रूपात प्रत्यक्ष दिसतं आहे का? का त्यांचे हेतूच फार मर्यादित आणि वेगळे आहेत? आपल्याकडे मुक्तपणाने केलेल्या, विविध पद्धतींच्या आणि पातळ्यांवरच्याही दर्जेदार समीक्षेचा अभाव असल्यानं हा बराचसा मामला स्वत: कवी व लेखक असण्याच्या हौसेचाच, म्हणजे मिरवण्याचाच आहे काय? की वाङ्मय क्षेत्रातील या सर्व हालचालींची एक निरोगी, प्रगतिशील प्रतिमा कुठं पहावी हेच आपल्याला कळत नाही? राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान आदींच्या वाङ्मय क्षेत्राशी जो एक विशिष्ट प्रकारचा आशयाच्या अनुषंगाने येणारा संबंध आहे त्याचं योग्य भान आपल्याला आहे का? मराठी साहित्याला इतर ज्ञानशाखांकडून त्याच्या जन्मदात्या लेखकांमार्फत काही पोषण-खाद्य मिळतं आहे की नाही? या शास्त्राचं वा राजकीय सामाजिक विचारसरणीचं वाङ्मयक्षेत्रावर आक्रमण झाल्यानंतर सहजपणे आपण वाङ्मयाच्या स्वायत्ततेचा आग्रहच सोडून देत आहोत काय? इंग्रजी भाषेतला विस्तृत आणि वैविध्यपूर्ण वाङ्मयव्यवहाराच्या तुलनेनं आपण आपल्या स्वत:च्या भाषेकडं नेहमीच पाहतो आहोत का? वेगवेगळ्या गटात विभागलेल्या आपल्या आधुनिक संदर्भात पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजरचनेचा तर साहित्यनिर्मितावर विपरीत परिणाम होत नसेल? म्हणजे पुरोगामी-प्रतिगामी म्हणून ओखळले जाणारे वैचारिक दृष्टिकोन सखोल वास्तवाचत्रणाच्या मार्गातील अडसर तर नाहीत ना? ...या प्रश्नमालिकेनंतर लेखकांच्या लेखनव्यवहाराकडे, प्रकाशकांच्या व प्रसारमाध्यमांच्या हालचालीकडे आणि वाचकांच्या अभिरुचीकडेही आपण काहीसं संदेहपूर्ण नजरेनंच पाहू लागतो. मग मराठी



वाङ्मयाचं सध्या काही खरं नाही या दुसऱ्या टोकाच्या विचाराकडं विचारांचा लंबक झुकू लागतो. असंही वाटतं की एखादा ज्ञानेश्वर-तुकारामाच्या तोडीचा प्रतिभावंत या मातीत येईल आणि त्याच्या प्रतिभेच्या झळाळीत हे सगळे प्रश्न मिटवून टाकण्याचं सामर्थ्य असेल.

– डॉ. सरोजिनी वैद्य

(मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषणातून १७-१-९८)


**निरंजन घाटे**
**यांची**
**विज्ञानावरील**
**वाचनीय पुस्तके**

अवकाश
इलेक्ट्रॉनिक्स
ज्ञानज्योति
आरोग्यवेध
शरीरवेध
यंत्रमानव व कृत्रिम बुद्धिमत्ता
असे शास्त्रज्ञ असे संशोधन
ज्ञानदीप
वसुंधरा
खेळ आणि विज्ञान
यंत्रलेखक
एकविसावं शतक

*अधिक माहितीसाठी संपर्क :*
**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी : ४७६९२४